

# चार महिन्यांची रात्र

मुकुंद कर्णिक

# चार महिन्यांची रात्र

## आणि इतर कथा

मुकुंद कर्णिक

ई साहित्य प्रतिष्ठान

चार महिन्यांची रात्र
आणि इतर कथा

मुकुंद कर्णिक
पोस्ट बॉक्स २६२४३४, दुबई, युनायटेड अरब एमिरेट्स.
टेलीफोन: +९७१५०५९७३८१०
विपत्र पत्ता: karnik.mukund@gmail.com
ब्लॉग : https://mahadvar.blogspot.ae

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे .तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन :१४ नोव्हेंबर २०१६

©esahity Pratishthan®2016

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य - प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे .

# चार महिन्यांची रात्र आणि इतर कथा

मुकुंद कर्णिक

अर्पणपत्रिका

वात्सल्य, प्रेम, मार्गदर्शन , प्रेरणा
हे सारे मला ज्यांच्याकडून मिळाले ते,  माझी आई आणि वडील,
कै. ती. सौ.  वत्सला आणि कै. ती. संतुराम रामकृष्ण कर्णिक
(कवि संराक)
यांच्या स्मृतीना अर्पण.

# प्रास्ताविक

या कथासंग्रहात माझ्या सात कथा आहेत. पहिल्या दोन कथांमधली मुंबई-पुण्याची पार्श्वभूमी सोडली तर बाकीच्या पाचही कथांमध्ये ती कोल्हापूरची आहे. किंबहुना या पाचही कथांचे नायक माझ्या गावातले – कोल्हापुरातले - आहेत. माणसे खरी आहेत, नावेही खरी आहेत. घटना बऱ्याचशा खऱ्या तर थोड्या फार काल्पनिक असतील. पण त्या कोणाला दुखवण्याच्या हेतूने तशा रंगवलेल्या नाहीत हे नक्की. आज मी स्वत: सत्तरीच्या घरात आहे आणि दुर्दैवाने ही सगळी माणसे मात्र हे जग सोडून गेलेली आहेत. पण माझ्या मनातले त्यांचे स्थान आणि त्यांच्या स्मृती कायम आहेत.

‘अल्लाकाका’ आणि ‘केळकर मास्तर’ या दोन्ही व्यक्ती माझ्या अतिशय आवडत्या आणि आदरणीय होत्या. अशा व्यक्ती आपल्या आयुष्यात येतात त्या आपल्याकडून काही घेऊन जात नाहीत तर बरेचसे देऊन जातात. या दोघांच्याही जीवनांनी मला अंतर्मुख व्हायला शिकवले.

‘कम व्हॉट मे, मला हसतमुखाने जीवन जगायचे आहे आणि मी तसाच जगणार’ ही प्रेरणा मला दिली. ‘आपल्या दु:खांचे सावट दुसऱ्यावर पडू द्यायचे नाही, तर आपले प्रसन्नवदनी स्मित त्यांच्यात पसरवायचे’ हा मूलमंत्र मला आपल्या आचरणातून शिकवला. त्यासाठी मी त्या दोघांचाही ऋणी आहे.

चार महिन्यांची रात्र ही कथा जन्मली ती माझा साहित्यिक असलेला धाकटा भाऊ सतीश (कवी प्रद्युम्नसन्तु) याच्या आवाहनातून. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे माझ्याहून सहा वर्षांनी लहान असलेला हा माझा भाऊ आज या जगात नाही. इडियोपॅथिक पल्मनरी फायब्रोसिस या फुफुसाच्या दुर्धर आजाराने केवळ दोन वर्षांत त्याचा बळी घेतला. या दोन वर्षातच स्वत:चा मृत्यु डोळ्यांसमोर दिसत असताना त्याने सुरु केलेल्या आणि चालवलेल्या www.rainbow26.com या वेबसाईटवरून त्याने कथालेखनाचे तंत्र आणि मंत्र शिकवणारा ‘ऑनलाईन’ वर्ग घ्यायला सुरुवात केली आणि मी विद्यार्थी म्हणून दाखल झालो. आयुष्यभर ज्याने कविता केल्या, गद्य लेखन फारसे केले नाही अश्या मी त्याच्याकडून

कथालेखनाचे धडे घ्यायला सुरुवात केली आणि दिलेला गृहपाठ म्हणून ‘चार महिन्यांची रात्र’ लिहिली. माझ्या ‘गुरुजींना’ ती आवडली आणि त्याबद्दल मला त्यांची शाबासकीही मिळाली.

‘टोटली न्यू लीफ’ ही कथा म्हणून मोठी वाटली तरी तिच्यातल्या संवादांच्या प्रांजळपणामुळे कंटाळवाणी वाटू नये.

शेवटच्या तीन कथा, म्हणजे शब्दचित्रे, पन्नास पंचावन, वर्षांपूर्वी ‘साप्ताहिक आलमगीर’ मध्ये प्रकाशित झाल्या होत्या. आज हे साप्ताहिकही अस्तित्वात नाही. नंतरच्या काळाशी सुसंगती ठेवावी म्हणून त्यांच्या कथनात अगदी जुजबी बदल केले आहेत इतकेच.

या सगळ्या कथा तुम्हाला आवडतील अशी आशा करतो.

मुकुंद कर्णिक

# चार महिन्यांची रात्र आणि इतर कथा

मुकुंद कर्णिक

# १. चार महिन्यांची रात्र

श्रीच्या मनात भावनांचा कल्लोळ उठला होता. खरंतर त्याला समजतच नव्हतं त्याला काय वाटतंय ते. आज एक वर्ष पुरं झालं बाबाना जाऊन. सकाळीच त्याचं बोलणं झालं आईशी त्याबद्दल. सांडू देत नसली तरी डोळ्यात भरून आलेले तिचे अश्रू श्रीच्या नजरेपासून लपून राहिले नव्हते. लहान होता तेव्हा रडणाऱ्या श्रीला मिठीत घेऊन त्याची समजूत काढणाऱ्या आईला आज श्रीनंच मिठीत घेऊन दिलासा दिला होता.

एक वर्षापूर्वी त्याच दिवशी आणखीही एक घटना घडली होती. श्रीला नोकरी लागली होती त्याच दिवशी. आणि आज ऑफिस सुटायच्या सुमारालाच बॉसनं केबिनमध्ये बोलावून एक पाकीट हातात ठेवलं होतं आणि म्हणाला होता, "इन ॲप्रिसिएशन ऑफ युवर एफर्टसं मिस्टर सरंजामे. नो, प्लीज डोंट थँक मी. यू डीझर्व्ह इट". पाकिटातल्या लेटरमध्ये त्याच्या पगारात वाढ केल्याचं लिहिलं होतं. म्हणूनच श्रीच्या मनात भावनांचा कल्लोळ होता. एक वर्षापूर्वी नोकरी लागली त्याचं दिवशी बाबा गेले आणि आज त्यांच्या पुण्यतिथीच्याच दिवशी पगारवाढ मिळते आहे अनपेक्षितपणे. हा योगायोग म्हणायचा की बाबा तिथं स्वर्गात बसून सूत्रं हालवतायत म्हणायचं? श्रीनं आकाशाकडे बघून दोन्ही हात जोडले आणि स्कूटर चालू केली घरी जाण्यासाठी.

घरी आल्यानंतर त्यानं आईला बातमी सांगून तिच्या पायावर डोकं टेकलं. तेव्हा त्याला आशीर्वाद देत आई म्हणाली, " होय रे बाळा. असं असतंच. गेलेलं माणूस देवाकडून आपल्या माणसांची सारी कामं पुरी करवून घेत असतं त्याला साकडं घालून. त्यांचे आशीर्वाद आहेत रे तुझ्या पाठीशी. तुझं सगळं चांगलंच होईल बघ इथून पुढं."

रात्री जेवणं झाल्यानंतर आईला आठवलं आणि ती श्रीला म्हणाली, " श्री, अरे तुला सांगायचंच विसरले. ती माझी मैत्रीण कालिंदी आठवते नं तुला? बडोद्याला असते ती कालिंदी करमरकर? हं तीच. सहासात वर्षांत आली नाही इकडं. त्यापूर्वी आली होती किती वेळा तरी. तिचं पत्र आलंय सकाळी. उद्या ती, तिचा नवरा जयंतराव आणि मुलगी समृद्धी येणार आहेत पुण्याला. अरे समृद्धीसाठी स्थळ आलंय म्हणे इथलं. कुणी चिंचवडकर म्हणून आहेत. उतरणार आहेत हॉटेलात पण आपल्याकडं येतील भेटायला. मी म्हणते त्या तिघाना जेवायला बोलावू या आपल्याकडं त्यांचा चिंचवडकरांकडचा कार्यक्रम आटपल्यावर. चालेल न?"

"न चालायला काय झालं आई? आणि मला काय विचारतेस. कुटुंबप्रमुख तू आहेस आता. मी नाही. आणि हो. समृद्धी इतकी मोठी झालीय? मागच्या वेळी आली होती तेव्हा दहावीत तर होती."

“म्हणजे काय? तूही तेव्हा कॉलेजात तर होतास पहिल्या वर्षाला. आज तू बी कॉम करून, एम बी ए करून वर नोकरीही करतोयस गेलं वर्षभर. म? काळ भराभर जातो बाळा. त्यातून मुली तर फार लवकर वाढतात. आणि समृद्धीनं बी. ए. केलं नं गेल्या वर्षी मुंबईत राहून रुईयातनं. ”

करमरकर कुटुंब आलं दुपारचा चिंचवडकरांकडला ‘परस्पर परिचय’ असं गोड नाव दिलेला पण खरं तर ‘मुलगी दाखवणे’ हाच परंपरागत खेळ असलेला कार्यक्रम आटोपून संध्याकाळी सातच्या सुमाराला. जयंतराव नव्हते आले. कालिंदीबाई आणि समृद्धीच फक्त. श्रीनंच दार उघडलं. “या मावशी, या, आणि..........” श्री बघतच राहिला मान वाकडी करून.........”या....या ना”.

ती ‘या ..या ना’ खळखळून हसली. “ या या काय म्हणतोस? ओळखलं नाहीस की काय मला श्री? अरे मी सम्री, समृद्धी.”

“अरे? सम्री तू?....तू? आणि सम्री?...इम्पॉसिबल! हायली इम्पॉसिबल! ओके. तरी पण ये आत तू पण”. श्रीनं स्वत:ला सावरून हसत म्हटलं.

एव्हाना आई बाहेर आली होती. मैत्रिणीचं स्वागत करून तिनं जयंतरावांची चौकशी केली. कालिंदीनं सांगितलं, “ अगं ते खूप

थकले आहेत आणि खरं तर थोडा मूड ऑफ झालाय त्यांचा म्हणून आले नाहीत ते. सॉरी म्हणायला सांगितलंय त्याच्या वतीनं ते म्हणून टाकते आधी आणि मग बोलू पुढं."

जेवता जेवता बोलण्यात आलं त्यावरून चिंचवडकरांची वागणूक अहंमन्यतेची, किंबहुना स्वत:ला अतिशय सुपीरियर आणि समोरच्याला तुच्छ मानणारी वाटली होती जयंतरावाना. मुलाबद्दल तर समृद्धीचंही इम्प्रेशन चांगलं नव्हतं झालं. बहुतेक हा परस्परपरिचय कार्यक्रम ओम्फस झाला होता तर. त्यामुळं तिघांनीही या स्थळाला वाटाण्याच्या अक्षता लावायचं ठरवलं होतं. ऐकून श्रीच्या काळजाचा एक ठोका चुकला. त्यानं हळूच समृद्धीकडं नजर टाकली. सात वर्षांपूर्वीची सम्रीची किरकोळ अंगलट आता खूपच समृद्ध झालेली होती आणि खूप आकर्षक दिसत होती आता ती. बोलणं पण अगदी जिंगल बेल सारखं किणकिणाटाचं तरीही मार्दवपूर्ण. तिनंही नेमकं त्याच वेळी हळूच श्रीकडं बघितलं आणि श्रीच्या काळजाचा आणखी एक ठोका चुकला.

जेवणानंतर आणखी थोड्या गप्पा मारून पुण्यात असलेल्या चार दिवसांच्या मुक्कामात पुन्हा यायचं आणि श्री बरोबर हिंडून बदललेल पुणं  बघायचं कबूल करून करमरकर 'मंडळी' निघून गेली. त्या चार दिवसात तीन भेटी झाल्या समृद्धीच्या आणि

श्रीच्या. भटकभटक भटकंती करून पुण्यातली बहुतेक सगळी थिएटर्स, उद्यानं, हॉटेल्स, वगैरे दाखवून आणि त्यांचा आस्वाद देऊन झाली. आणि मग  शेवटच्या दिवशी संध्याकाळी अनाकलनीय पण हवीहवीशी वाटणारी हुरहूर मनात घेवून दोघांनी एकमेकांचा निरोप घेतला.

दुसऱ्या दिवशी आपल्याला काहीच माहित नाही असं भासवत सहज विचारल्यासारखी आईनं गुगली टाकली, “काय रे श्री? विचारू कलिंदीला?” आपण त्या गावचेच नाही असं भासवायचं श्रीच्या मनात पहिल्यांदा आलं होतं. पण कदाचित उलटाच परिणाम व्हायचा या शंकेनं त्यानं उत्तर दिलं, “ आई, तुझ्या मनात असेल तसं कर.” कित्तीतरी दिवसात आज पहिल्यांदा आई प्रसन्नतेनं आणि मनापासून हसली.

***

दहा वाजून गेले होते. पण श्री अजूनही अंथरुणातच होता. ‘ठक ठक’ - सुखनिद्रेत असतानाच कुणीतरी दार ठोकलं. पहिल्यांदा दुर्लक्ष केलं तर दुसऱ्यांदा परत तेच. काय त्रास आहे म्हणत श्रीनं कष्टपूर्वक डोळे अर्धवट उघडले. “आई, दूधवाला आलाय बघ.” श्रीनं परत डोळे मिटून घेत आवाज दिला. “कळलं हो! दूधवाला! दूधवाल्यानं सकाळी सहा वाजता दिलेलं दूध एव्हाना संपतही आलंय. ऊठ आता, नाहीतर चहा मिळणार नाही. बघते मी कोण आलंय. बहुतेक टपाल असणार." पाच एक मिनिटांनी कुरकुरतच

श्री उठला. दात ब्रश करून आणि बाहेरच्या टेबलावर पडलेली दोन पाकिटे घेऊन चहासाठी येऊन बसला. नाही म्हटलं तरी उत्सुकता त्यालाही होतीच. त्यातलं एक तरी समृद्धीचं असणार अशी अपेक्षा होती. ती पुरी झाली. पत्र पाहून त्याला झालेला आनंद पहायला आई समोरच होती. तिनं ओळखलंच कुणाचं पत्र ते. तीही खूश झाली. श्रीला तरी आणखी कोण हवं होतं त्याच्या आनंदात सहभागी व्हायला? तो आणि आई इतकीच तर होती त्याची दुनिया.

वर्षापूर्वी वडील गेल्यानंतर ते दोघेच रहायचे त्या घरात. एकरभर जागा होती, घर आणि शिवाय विहीरही. गोड पाणी होतं विहिरीचं. श्रीला वडिलांनी स्वत: काबाडकष्टात दिवस काढून म्हणेल तितकं शिकू दिलं होतं. बी कॉम, एमबीए केल्यानंतर श्रीला पुण्यातच चांगली नोकरी लागली होता. आणि आता वरच्या पोस्टवर प्रमोशनची संधी आली होती इतक्या लवकर. बस्स, तेवढी काल दिलेली परिक्षा पास व्हायला पाहिजे. पास होणार याची खात्री होतीच त्याला. त्यालाच काय आईलाही आणि समृद्धीलाही होती. श्रीच्या चेहऱ्यावर स्मित उमटलं. आईनं त्याला विचारलं' "काय झालं रे? ठीक आहे ना सगळं? काय म्हणते माझी होणारी सून?" श्री म्हणाला, "ठीक. फर्स्ट क्लास आहे सगळं आई. अगं समृद्धी आणि तिचे वडील येणार आहेत पुढच्या आठवड्यात इथं तुला भेटून पुढची बोलणी करायला".

आई आनंदली. डोळ्यातलं पाणी पुसून म्हणाली, "समृद्धी तुला फार आवडली होती म्हणून तर मी देव पाण्यात घालून होते सून मिळावी तर तीच म्हणून. जा आता, आवर पटापट आणि मुडशिंगीकर आण्णाना जाऊन भेट. त्यांचा आशीर्वाद घे. मी देवाला साखर ठेवते".

श्री स्नान वगैरे आवरून बाहेर निघाला खरा पण ते दुसरं पत्र मात्र त्यानं आईपासून लपवलं होतं. आणि त्या पहिल्या पत्राच्या आनंदात आईही विचारायचं विसरून गेली होती. गाडी काढून तो मुडशिंगीकर आण्णाना भेटायला निघाला तेव्हा ती दोन्ही पत्रं त्याच्या खिशात होती आणि चेहऱ्यावर अगदी गंभीर भाव. असे गंभीर की जसं काही एखादं मोठं संकट कोसळलंय त्याच्यावर.

पाषाण ते सहकार नगर, पुण्यातला आताचा वाढलेला ट्राफिक पाहता, नाही म्हटलं तरी दीडएक तासाचा रस्ता होता. गाडीही तशी जुनी झाली होती. प्रमोशनचं नक्की झालं तर ही काढून नवी फोर व्हील ड्राईव्ह घ्यायची हा विचार त्याच्या मनात घोळत होता. हो, आता लग्नानंतर वर्षभरात चांगली आणि जिच्यात प्रॅम ठेवता येईल अशी मोठी गाडी असायलाच लागणार होती ना? श्रीला खुद्कन हसू आलं. आण्णासाहेबाना विचारलं पाहिजे हे पण. घरातून निघून एव्हाना एक तास झाला होता. स्वारगेटजवळ गाडी आली होती. सहकार नगरातल्या आण्णासाहेब

मुडशिंगीकरांच्या घरी पोचायला अजून किमान अर्धा तास तरी हवा होता. श्रीचं मन अजून अस्थिर होतं. तो विचारात गुरफटला होता. गाडी चालवायची खूपच सवय म्हणूनच केवळ तो त्या अवस्थेतही व्यवस्थित गाडी चालवू शकत होता. पण अस्वस्थता वाढत चालली होती. जकातनाका जवळ आला होता.

समोरच असलेल्या एका हॉटेलासमोर श्रीनं गाडी थांबवली आणि तो आत गेला. वेटरला चहाची आर्डर दिली. खिशातलं ते दुसरं पत्र उघडून पुन्हा वाचलं. वाचता वाचता त्याचा चेहरा अधिकच गंभीर झाला. आता श्रीला अस्वस्थ वाटायला लागलं आणि वेटरनं आणून ठेवलेला चहा न पिताच पण पैसे टेबलावर ठेऊन उठून तो गाडीत येऊन बसला. पाचेक मिनिटं तसच सुन्न अवस्थेत बसल्यानंतर त्यानं गाडी सुरु केली आणि सहकारनगरच्या दिशेनं निघाला.

अर्ध्या तासाचा रस्ता. पण विचारात गढल्यामुळं पंचेचाळीस मिनिटं लागली त्याला आण्णासाहेबांच्या घरी पोचायला. घर चांगलं प्रशस्त होतं, अगदी स्वतंत्र आणि प्रशस्त देवघरासहित आणि लिव्हिंग रूममध्ये छताला टांगलेल्या लाकडी झोपाळ्यासहित. सकाळी अर्धा तास पेपर वाचत आणि दुपारी कुंडल्या, पत्रिका, पंचांग बघत तास दीड तास या झोपाळ्यावर बसायचा त्यांचा नित्यक्रम होता. आण्णासाहेबांचा ज्योतिषशास्त्राचा अभ्यास दांडगा होता त्यामुळं ते लोकांना भविष्यविषयक सल्ला देणे, कुंडल्या करून देणे, पत्रिकांचा

अभ्यास करून योग्य तो सल्ला देणे ही कामे आनंदाने आणि निरपेक्ष वृत्तीने करत. मागायचे नाही पण कोणी काही देऊ केले तर ते स्वीकारायचे, त्याचा अव्हेर करून देणाऱ्याचा अपमान करायचा नाही हे त्यांचे व्रत होते. श्रीच्या वडिलांची आणि आईचीदेखील आण्णासाहेबांवर नितांत श्रद्धा होती. श्रीच्या जन्मापासून साऱ्या अडीअडचणींच्या वेळी तसेच चांगल्या कार्यांमध्ये आण्णासाहेबांचा सल्ला घ्यायला दोघेही चुकत नसत. आणि त्यांचा सल्ला दरवेळी तंतोतंत बरोबर ठरायचा याचा त्याना अनुभव आलेला होता. म्हणून तर आईनी श्रीला आज त्यांच्याकडे पाठवलं होतं.
श्री पोचला तेव्हा पांढरे शुभ्र तलम धोतर आणि मलमलीचा सदरा घातलेले, प्रसन्न मुद्रेचे आण्णासाहेब नित्यनैमित्तिक पूजापाठ आटपून कोणाशी तरी त्यांच्या सेलफोनवर बोलत सोफ्यावर बसलेले होते.

श्रीनं आत जाताच आण्णासाहेबांच्या पायांना हात लावून नमस्कार केला. फोनवर बोलत बोलतच त्यांनी श्रीच्या डोक्यावर हात ठेवला आणि त्याला बसायला खुणावले. मिनिटभराने फोन संपल्यावर त्यांनी श्रीला येण्याचे कारण विचारले. प्रमोशनसंबंधात विचारल्यावर ते जरा वेळ स्वस्थ बसले आणि त्यांच्या सवयीप्रमाणे डोळे मिटून उजव्या हाताच्या आंगठ्याने उरलेल्या चारी बोटांच्या टोकांना क्रमाक्रमाने आणि पुन्हापुन्हा स्पर्श करत विचारमग्न

झाले. हे नेहमीचेच होते पण आज जास्त वेळ त्यांची ही समाधी लागली. श्रीची अस्वस्थ चुळबूळ चालू झाली. जवळजवळ पाचएक मिनिटांनंतर त्यांनी डोळे उघडले आणि म्हणाले, "श्री, बाळा, तू दिलेली परिक्षा पास होणार पण प्रमोशनचा योग आत्ता नाही. काही तरी अघटिताचा मला संभव दिसतोय. प्रमोशन होईल पण त्याला किमान आठ ते नऊ महिने जावे लागतील. जरा काळजी घे एव्हढंच सांगतो. ये आता. शुभं भवतु." निरोप घेऊन श्री निघाला. घरी येण्यापर्यंतचा त्याचा प्रवास अस्वस्थतेच झाला. सकाळी आलेलं दुसरं पत्र असंच अस्वस्थ करणारं होतं आणि त्यात आण्णासाहेबांचं हे भाकीत!

श्री घरी पोचला. आण्णासाहेबांनी आशीर्वाद दिले आहेत एव्हढंच सांगून काही तरी अर्जंट काम आठवलंय म्हणून तो बाहेर गेला. गाडी घेतली नाही. वाटेत त्रास दिला म्हणून नेत नाही आणि यायला रात्र होईल, उशिर झाला तरी वाट बघू नको एव्हढच आईला म्हणाला जाताना. इतका विमनस्क अवस्थेत होता की आपला मोबाईल फोन गाडीतच विसरला आहे हे त्याच्या लक्षातही आलं नाही. गेला तो सरळ एशियाड बसने मुंबईला.

***

रात्र झाली होती. काय होतंय हे कळायच्या आतच श्रीच्या डोळ्यांपुढं अंधारी आली आणि तो ओघळल्यासारखा खाली पडला. एखाद्या मिनिटापुरतंच असेल पण संपूर्ण ब्लँक झाल्या त्याच्या संवेदना. जेव्हा शुद्धीवर आला तेव्हा पहिल्या प्रथम त्याच्या नजरेला "आर यू ऑलराईट? ऐकू येतंय? इधर देखिये. ये कितनी उंगलियाँ हैं बताइये?" असं म्हणत त्याला आधार देत असलेली एक मुलगी दिसली. "या, ओके. ठीक आहे मी." असं म्हणत श्रीनं सावरून बसायचा प्रयत्न केला. "थँक गॉड! नाऊ रिलॅक्स" असं म्हणत तिनं कुणाला तरी "जितूभाई, इन्हे हॉस्पिटल ले जाना चाहिये. यहाँसे करीबही है हमारा यशोदा हॉस्पिटल. वहाँ ले चलेंगे. कोई गाडीका इंतजाम कर सकेगा?" असं विचारलं. कुणीतरी आपली गाडी मॉलच्या दाराशी मागवली तर आणखी कुणीतरी खुर्ची आणली. तो "नको, मी चालेन" म्हणत असतानासुद्धा, "नही भाईसाब, फिकर मत कीजिये, चलना नही. आपको कुर्सीपरसे गाडीतक ले जाएंगे" म्हणत त्याला खुर्चीवर बसवून दोघा तिघानी उचलून आणून गाडीत बसवलं. मुलगीही त्याच्या शेजारी बसली आणि तिनं ड्रायव्हरला " यशोदा हॉस्पिटल चलना" असं सांगितलं. गाडी काही मिनिटातच हॉस्पिटलमध्ये पोचली. डॉक्टरनी प्राथमिक तपासणी केली आणि त्याला विचारलं "व्हॉट्स युअर नेम सर?" श्रीनं उत्तर दिलं " मी.. व्हॉट द हेक्! माझं नाव? काय माझं नाव? माय गॉड! हू ॲम आय?" बरोबर आलेली मुलगी तिथली नर्सच होती. ती अवाक् होऊन त्याच्याकडे बघतच

राहिली. 'हेल्प मी प्लीज' अशा नजरेनं श्रीनं तिच्याकडं पाहिलं आणि बघता बघता तिच्या नजरेत त्याच्याबद्दल कणव भरून आली.

रात्रीचे दहा वाजले होते. नर्सने सिडेटिव्ह देऊन "अभी सो जानेकी कोशिश करो" म्हणून सांगितलं. पण डोक्यात गेल्या झोप कशी येणार? "कसा आलो मी तिथं मॉलमधे? का? कोण आहे मी?" श्रीला काहीच आठवत नव्हतं. डोकं भणाणून गेलं होतं. ना नाव आठवतंय, ना पत्ता, ना कुणाचा फोन नंबर. काय झालंय हे? विचार करत श्री पडून राहिला. हळू हळू सिडेटिव्हचा परिणाम व्हायला सुरुवात झाली. श्रीच्या डोळ्यावर गुंगी चढायला लागली. आणि गुंगीतच शारदा, ती मुलगी जिनं त्याला हॉस्पिटलमध्ये आणलं होतं, डोळ्यांपुढं उभी राहिली. खरं तर प्रत्यक्षातच ती येऊन उभी होती. नाईटड्यूटीवरची परिचारिका म्हणून. म्हणत होती, "रिलॅक्स. शांत पडून रहा. आठवेल तुम्हाला. मी आहे मदत करायला. आपण मिळून शोधून काढू. होल्ड दोज टीअर्स. प्लीऽऽज". श्री तिला म्हणाला, "मला काही तरी सांगा, कोण आहे मी? आय् ॲम स्केअर्ड, चाचपडतोय मी, होल्ड माय हँड प्लीज, प्ली...ज". आणि झोपेनं त्याचा ताबा घेतला.

सकाळ झाली. शारदा गेल्या तीन दिवसांच्या परिपाठाप्रमाणं फुलांचा गुच्छ घेऊन आली. म्हणाली, "गुड मॉर्निंग मिस्टर एक्स,

कसे आहात? झोप लागली? येस? हे छान झालं! ब्रेकफास्ट झाला? मी हे पोहे आणलेत ते खा जरा वेळानं. आज मला आमच्या मालाड हॉस्पिटलला जायचंय ट्रेनिंगसाठी. पुन्हा दिवसभर यायला नाही मिळणार. रेस्ट घ्या, जास्त विचार करू नका ओके?" आणि त्याच्या हातावर थोपटून ती निघून गेली. आज तिच्या स्पर्शात नर्स म्हणून कर्तव्यभावनेपोटीची कणव नव्हती, जास्त आत्मीयताच होती.

श्रीची ब्रेन मॅपिंग, एम आर आय वगैरे सगळ्या तपासण्या होऊन रिझल्ट्स स्पेशॅलिस्ट डॉक्टरच्या शिफारशींसह यायला आठ दिवस लागले. त्यात 'स्ट्रेस रिलेटेड ट्रॉमा ' मुळे 'टेम्पररी मेमरी लॉस' हे निदान झालं. आजार सुदैवानं क्युअरेबल होता. हे ऐकून त्याला आणि शारदाला सुद्धा हायसं वाटलं. पण ट्रीटमेंट दीर्घकाळ चालणार होती. आठ दिवसांनंतर शारदा आणि तिने बोलावून घेतलेले तिचे वडील त्याला आपल्या घरी घेऊन गेले. तिथे उपचार, औषधे, विश्रांती वगैरेमुळे चार महिन्यामध्ये आलेल्या परीस्थितीशी तडजोड करत श्री शारदाच्या वडिलांनी सुचवलेले आनंद हे नाव घेऊन जगू लागला.  आणि या काळात आनंद आणि शारदामध्ये एकमेकाबद्दलचं आकर्षण आणि प्रेम वाढीला लागलं.

आता जास्त विचार करायचं त्यानं सोडलं होतं तरीही कधी कधी रात्रीची झोप न येता पुन्हा पुन्हा त्याला आपल्या आयडेंटिटीचा

प्रश्न सतावायचा आणि तो काही दुवे जुळतायत का ते बघायचा प्रयत्न करायचा. चार महिने उलटले. नव्या आयुष्याशी आनंदनं आता तडजोड केली होती आणि त्यात तो रमलाही होता. तरीही अधून मधून तो माणसात नसल्यासारखा घुमा होऊन जायचा. अंतर्मनात काही दुवे जुळवत असावा असे वाटायचे.

असेच एका रात्री जेवणानंतर आनंद, शारदा आणि तिचे वडील वसंतराव त्यांच्या आवडीची कॉफी घेत बसले होते. गप्पा मारता मारता विषय वसंतराव वाचत असलेल्या मध्ययुगीन युरोपच्या समाज व्यवस्थेवरील, मार्क ब्लॉक (Marc Bloch) या लेखकाच्या Feudal Society नावाच्या पुस्तकाकडे वळला. कुतूहलाने ऐकत असलेल्या शारदाने वडिलाना विचारले, “बाबा फ्यूडल लॉर्डसचा अर्थ काय?” वसंतराव म्हणाले, “अग, फ्यूडलिझम म्हणजे सरंजामशाही. मध्ययुगीन युरोपात फ्यूडल लॉर्डस - जमिनीचे मालक - म्हणजे राजाकडून मिळालेया अफाट जमिनींचे सरंजामदार छोट्या छोट्या शेतकऱ्यांना म्हणजे कुळाना आपल्या सरंजामीतल्या जमिनी कसायला देत आणि त्याबदली जमिनीच्या उत्पन्नातून मालकाला खंड देणे, मालकाच्या संरक्षणासाठी प्रसंगी विनामोबदला हत्यार उचलून लढाया करणे, मालक सांगेल ती कामे करणे, तो बोलवील तेव्हा त्याच्या वाड्यात हजेरी लावणे इत्यादी प्रकारची ‘परतफेड’ करण्याचा करार लिहून घेत. या सगळ्या सेवा करता करता ते शेतकरी पिचून जात. एक प्रकारे कुळाना वेठीला धरल्यासारखेच करत हे सरंजामदार.

मालक आणि कुळ अशी सरंजामशाही आपल्याकडेही होतीच ना अगदी अलीकडेअलीकडेपर्यंत."

लक्ष देऊन ऐकत असलेला आनंद एकदम अस्वस्थ झाल्यासारखा करायला लागला आणि गप्प झाला. काही तरी धक्का बसल्यासारखा अचानक कप टाकून देत उठून उभा राहिला आणि ओरडला, "मला काही काही आठवतंय शारदा...... सरंजामे... शारदा, मी... मी.... श्री आहे, ...... श्रीनिवास सरंजामे. आई... माझी आई.... पुण्यात आहे....पाषाणमध्ये एनसीएल जवळ घर आहे माझं". आणि तो नॉनस्टॉप काहीतरी सांगायचा प्रयत्न करू लागला. या अनपेक्षित प्रसंगामुळे शारदा घाबरली पण वडिलांच्या मदतीने तिनं त्याला बेडरूममध्ये नेऊन शांत केलं आणि सकाळी बोलूया म्हणून झोपेची गोळी देऊन झोपवलं.

दुसऱ्या दिवशी उठल्यावर शांत झोपेमुळे आणि मनावरलं दडपण उतरल्यामुळे श्री फ्रेश होऊन चहा घ्यायला बसला आणि मग त्याला हळू हळू जसं जसं आठवायला लागलं तसं तसं तो रोज सांगत गेला. एकदमच सगळं आठवायचा प्रयत्न करण्याचा ताण त्याच्यावर पडू नये म्हणून शारदा जपत होती. चारपाच दिवसात थोडे थोडे करत बऱ्यापैकी संगतवार घटना आठवल्या श्रीला. त्याला आठवलं तो कां मुलुंडला गेला होता ते आणि स्ट्रेस कसला होता ते.

त्याला आलेलं दुसरं पत्र मुलुंडहून कुणा मदन शर्माचं होतं. समृद्धीबद्दल. समृद्धीचा आणि मदन शर्माचा जवळीक दाखवणारा एक फोटोही होता सोबत. खुलासा करून घेण्यासाठी श्री मुलुंडला गेला होता पण आईला न सांगता. मदन शर्मानं श्रीला त्याची आणि समृद्धीची रुईया कॉलेजामध्ये भेट झाल्यापासूनच्या घटना सांगून फोटो, समृद्धीची त्याला आलेली पत्रं, अगदी शेवटच्या, म्हणजे श्रीशी लग्न ठरत असल्यामुळं मदनने आपली सगळी पत्र, फोटो परत करावेत आणि आपल्याला विसरून जावं असं लिहिलेल्या पत्रासहित, श्रीला दाखवली. मदननं श्रीला हेही सांगितलं होतं की श्रीनं समृद्धीला नकार देऊन बाजूला व्हावं नाही तर तो सगळा पत्रव्यवहार तो श्रीच्या आईला आणि समृद्धीच्या वडिलांना दाखवेल. शिवाय श्रीनं समृद्धीशी लग्न केलंच तर त्यांचं आयुष्य मिझरेबल कसं होईल ते बघण्याची छुपी धमकीही त्यानं ध्वनित केली होती. त्यानं ही धमकी समृद्धीला दिली नव्हती कारण त्याचं तिच्यावर प्रेम होतं आणि त्याला तिच्याशी लग्न करायचं होतं. श्री सरळपणे बाजूला झाला तर ते सोपं जाणार होतं. भेटीनंतर श्री निघाला तेव्हा त्याचं मनस्वास्थ्य पार खलास झालं होतं. तिरीमिरीत पत्र आणि फोटो दोन्ही फाडून टाकले पण डोकं विचार करून करून पिंजून गेलं आणि कमालीचं दुखायला लागलं म्हणून तो मॉलमध्ये फार्मसीतून औषध घ्यायला गेला आणि तेव्हाच डोळ्यापुढं अंधारी येऊन कोसळला होता.

सगळा खुलासा झाला आणि मग शारदा आणि तिचे वडील वसंतराव लिखिते यांनी चक्र जोरात फिरवली. त्यांनी श्रीच्या आईशी लगेच संपर्क साधला आणि तिला मुंबईला बोलवून घेतलं. मुलगा मिळाला आणि तो सुखरूप आहे या नुसत्या बातमीनंच बिचारी माउली तहान भूक विसरून तातडीनं मुंबईला आली. शारदा आणि वसंतरावानी सुधाताई आणि श्रीला भेटवलं आणि श्रीला बघूनच सुधाताईच्या डोळ्यातनं पाणी अविरत वाहायला लागलं. दोघंही एकमेकाला घट्ट मिठी मारून रडले.

सावरल्यानंतर आनंदानी सगळे जेवायला बसले तेव्हा श्रीनं आईसाठी पुन्हा एकदा सगळ्या घटना वर्णन करून सांगितल्या. आईनंही गेल्या चार महिन्यातल्या पुण्यातल्या घटना सांगितल्या. हवालदिल सुधाताईनी जेव्हा आण्णासाहेबाना श्रीबद्दल विचारलं तेव्हा त्यांनी  सांगितलं होतं श्री एका कसल्या तरी फार मोठ्या संकटातून वाचला असून ठीक असावा आणि तो परत येईल, धीर धरावा. त्या दिलासा देणाऱ्या बोलानीच सुधाताईना साथ दिली होती, धीर दिला होता.  पण समृद्धीच्या आई वडलाना धीर धरता आला नाही. एके दिवशी कालिंदी करमरकरांचा फोन आला आणि त्यांनी श्रीचा अजून पत्ता नाही, अजून वाट किती बघणार तेव्हा समृद्धीसाठी दुसरी स्थळे बघायला जयंतरावानी सुरुवात केली असल्याच सांगितले. सुधाताई सौजन्यमूर्ती असल्यामुळे त्यांनी मोठ्या मनाने त्याना मोकळीक देऊन वर समृद्धीचं भलं होवो असा आशीर्वाद दिला. गेल्याच महिन्यात समृद्धीचं आणि मदन

शर्माचं लग्न झाल्याचंही त्यांनी सांगितलं. ही बातमी ऐकून श्रीच्या मनातली उरलीसुरली टोचणी दूर झाली.
चार दिवस शारदा आणि वसंतरावांच्या घरी आनंदात राहून सुधाताईनी श्रीला घेऊन पुण्याला जायचा विषय काढला. चार दिवसात सुधाताईच्या चाणाक्ष नजरेतून श्री आणि शारदाच्या एकमेकांबद्दलच्या प्रेमाच्या भावना सुटणं शक्य नव्हतं. त्यामुळं त्यांनी शारदा तसेच वसंतरावानाही बरोबर येण्याची गळ घातली. वसंतरावानीही मग आपल्या गाडीतून दोघाना सोडायला पुण्याला जाऊ या असं शारदेला सांगितलं. शारदेनं अर्थातच तत्परतेनं होकार दिला आणि ते चौघेजण पुण्याला गेले. पुण्यात शारदा आणि श्री दोघंही आनंदानं एकमेकांच्या सहवासात फिरत असताना एक दिवस सुधाताईनी वसंतरावांकडे त्या दोघांच्या लग्नाविषयी विचारणा केली. वसंतरावानाही शारदेच्या मनातली श्रीबद्दलची ओढ आधीच कळली होती त्यामुळे त्यांनीही आनंदाने होकार दिला.

आण्णासाहेब मुडशिंगीकरांचा आतला आवाज यावेळीही सत्य सांगणारा ठरला होता. आणि म्हणूनच आज आईने श्रीकडे सहकारनगरच्या फेरीसाठी आग्रह धरला. श्री, आई, शारदा आणि वसंतराव असे चौघे वसंतरावांच्याच गाडीतून आण्णासाहेबांच्या घरी निघाले. वसंतरावांनी गाडीची किल्ली श्रीच्या हातात दिली आणि म्हणाले, "घ्या श्रीनिवासराव, बघा तरी आमची गाडी कशी

वाटते ते. आज मी साईडला बसणारेय.  रोज ड्रायव्हिंग करून कंटाळलो. आज अगदी श्रीकृष्णाच्या शब्दात 'न धरी चक्र करी मी, गोष्टी सांगेन सेफ्टीच्या चार' बस्स".

शारदा खळखळून हसली आणि म्हणाली, " होय हो बाबा, सेफ ड्रायव्हिंगच्या टिप्स कुणीतरी श्रीला देणं आवश्यक आहेच. काय श्री?"

आईने पण हसून दुजोरा दिला. श्रीही हसला आणि म्हणाला, "बघ हं, ड्रायव्हिंग करता करताच माझी स्मृती पुन्हा गेली आणि सहकारनगरऐवजी गाडी मुलुंडला पोचली तर मला दोष नाही द्यायचा मग."

वसंतरावही हसून म्हणाले, " अहो मुलुंडला पोचली गाडी तरी काही हरकत नाही. फक्त यावेळी तुम्ही यशोदा  हॉस्पिटलात न जाता सासुरवाडीला पोचाल".

असा हसत, गप्पा गोष्टी करत प्रवास झाला आणि सगळे आण्णासाहेबांच्या घरी पोचले. आज आण्णासाहेब फ्री होते. निवांतपणे काही कुंडल्या, पंचांग पहात झोपाळ्यावर बसले होते.

आई आणि श्रीला बघून ते म्हणाले, "अरे या या, सुधाताई. ये श्री. बरा आहेस ना बाळा? सुधाताई, आज अचानक कसं काय येणं केलं? आणि पाहुणे कोण? या या बसा. बस बाळ तू पण बस."

आई म्हणाली, " आण्णा, पाहुण्याना घेऊन यायचं म्हणूनच आलो आम्ही दोघही आज. हे वसंतराव लिखिते आणि ही त्यांची एकुलती

एक कन्या शारदा. मुंबईला असतात. आणि आण्णा, श्री आणि शारदा  लग्नाच्या बंधनात पडण्यापूर्वी तुमच्या पाया पडायला आलेत."

आण्णा म्हणाले, "वा वा ही तर फारच चांगली गोष्ट आहे. आत्ता या क्षणाला या खोलीत ज्या वेव्हज निर्माण झाल्या आहेत आणि मला जे थोडेफार फेस रीडिंग अवगत आहे त्याच्या अनुसार मी सांगतो ही जोडी अगदी लाखात एक ठरेल. बाकी तुम्हाला हवेच असेल तर आणि बरोबर आणली असेल तर या मुलीची कुंडली मी पाहीन पण मला तरी तशी आवश्यकता वाटत नाही. माझे आशीर्वाद आहेत जोडीला. कधी करताय कार्य?"

सुधाताई आणि वसंतराव, दोघही म्हणाले, "आपणच मुहूर्त काढा. आमच्याकडून काहीच हरकत नाही अगदी लवकरात लवकरचा मुहूर्त निघाला तरी. वुई विल मॅनेज."

आण्णासाहेब मोठ्यानं हसले आणि खोकल्याची उबळ आवरत म्हणाले, "लिखिते साहेब, अहो वधुवरांऐवजी व्याहीमंडळीनीच गुढग्याला बाशिंग बांधायचा प्रकार झाला हा. अहो लवकरात लवकरचा उत्तम मुहूर्त परवाचाच आहे. पण नाही म्हटलं तरी तयारी, आमंत्रण वगैरेसाठी वेळ हवाच ना? तेव्हा असं करा, आज सहा तारीख आहे, दुसरा तितकाच चांगला मुहूर्त सत्तावीस तारखेला, म्हणजे आणखी तीन आठवड्यानी आहे. तो निश्चित करा. काय रे बाळानो, तुमची तर काही हरकत नाही नं तिथवर थांबायची? मं झालं तर". सुधाताईनी देऊ केलेले दक्षिणेचे पैसे

आण्णासाहेबांनी त्याना देवघरात जाऊन देवासमोर ठेवायला सांगितले आणि नंतर सर्वांना "शुभं भवतु" म्हणून निरोप दिला.

मध्यंतरी श्रीच्या कंपनीनं सहानुभूतीपूर्वक विचार करून त्याची चार महिन्यांची गैरहजेरी बिनपगारी रजेसारखी ट्रीट करून त्याला नोकरीवर रुजू करून घेतलं आणि जरी या घटना होण्यापूर्वी तो प्रमोशनसाठीची परिक्षा पहिल्या क्रमांकाने पास झालेला असला तरी आता त्याची सिनीऑरिटी गेली असल्यामुळं पुढच्या खेपेला म्हणजे आणखी आठ महिन्यांनंतर प्रमोशन देण्याचं आश्वासनही दिलं.

यानंतर तीन आठवड्यांनी श्री आणि शारदा यांनी सप्तपदी केली, 'नाऽऽतिचरामि' शपथ घेतली, यापुढल्या घटना म्हणजे लवकरच श्रीने नवीन टॅव्हेरा फोरव्हील ड्राईव्ह घेतली, तिला मागील काचेवरून बाहेरच्याना दिसेल असा, दीड वर्षाच्या अंतराने दोन वेळा, 'बेबी ऑन बोर्ड' स्टिकर लावला आणि 'हम दो, हमारे दो' असा सुखेनैव संसार केला. हे सगळं तुम्हाला मी सांगायची गरज आहे असं नाही ना?

---

# २. टोटली न्यू लीफ

स्वास्थ्य समाधानाचं जीवन जेव्हा जगायला मिळतं तेव्हा आयुष्यात आधी भोगलेल्या हालअपेष्टांची, अडीअडचणींची, हेव्यादाव्यांची, रुसव्याफुगव्यांची  टोचणी खूपच कमी झालेली असते. किंबहुना 'आता कशाला किल्मिषांचं, कटु भावनांचं ओझं बाळगायचं' या विचारानं आपण तृप्तीच्या जवळ पोचतो नकळतच, आणि केवळ चांगल्या आठवणीच कृतज्ञतेच्या भावनेने जपायला लागतो. वयाची पंचावन्न साठ वर्षं पुरी झाली की या आत्मानंदी अवस्थेचा अनुभव यायला लागतो. पहाल तुम्ही, जेव्हा ६०व्या वाढदिवशी तुमची बायको, मुलगा आणि सून "हॅपी बर्थडे, बाबा" असं म्हणून तुम्हाला मिठी मारत तुमच्यासाठी त्यानी आणलेला आणि तुम्ही कापून भरवलेला केक खाता खाता म्हणतील, "बाबा, आता पुरे करा नोकरी. खूप केलंत तुम्ही आमच्यासाठी. आता विश्रांती घ्या. नोकरीत एक्स्टेन्शनसाठी खटपट वगैरे काही करू नका". हे शब्दच तुम्हाला सुखावून जातील आणि मग मी वर म्हटलं ती आत्मानंदी अवस्था जाणवायला लागेल.

संजयचं असंच झालं. एकोणसाठाव्या वाढदिवशीच त्यानं या अवस्थेत प्रवेश केला. आदल्या दिवशी संध्याकाळी तो

ऑफिसातून आल्यानंतर त्याची बायको प्रमिला, श्रीलेखानं, म्हणजे त्यांच्या सुनेनं, करून दिलेल्या गरमागरम कांदेपोह्यांची बशी आणि वाफाळणारा चहाचा कप द्यायला आली तेव्हाच म्हणाली, "ध्या. पेपर ठेवा आता बाजूला. आणि, मी काय म्हणते? (इथं बायका प्रश्नचिन्हाचा प्रयोग का करतात कळत नाही. वास्तविक पुढचं वाक्य हे त्यांचं स्टेटमेंट असतं, तुम्हाला त्याचं उत्तर माहीत असायची सुतराम शक्यता नसते तरीही) लेखा म्हणत होती, आणि धनंजयही नेहमी म्हणतो तसं आता बस्स करा नोकरी. खूप झालं. गेली जवळजवळ चाळीस वर्षं नोकरी करताय. थकून गेलायत हा त्रास आमच्यासाठी घेता घेता. अगदी रया गेलीय तुमच्या चेहऱ्याची. आपल्या लग्नाआधी किती राजबिंडे दिसत होतात. आठवतंय? लतिका मला म्हणायची, 'ताई, अग जिजू मलाच का नाही आधी भेटले? भेटले असते नं तर मीच त्याना सांगितलं असतं, माझ्याशीच लग्न करा म्हणून.' हसताय काय? चेष्टा पुरे. खरंच सोडा नोकरी आता. बस्स झालं."

संजयनं आत्मानंदाच्या दुनियेची पहिली पायरी ओलांडली.

दुसरी आणि तिसरी पायरी दुसऱ्या दिवशी केक कापल्यावर धनंजय आणि श्रीलेखानं हेच सांगितलं तेव्हा, आणि पुढच्या सगळ्या पायऱ्या एका दमात ओलांडल्या जेव्हा नातू सुजय मांडीत बसून म्हणाला, "हॅपी बल्डे आबा, मला भल्वा नं केक. आनि आता मला शालेत पोच्वायला आनि घली आनाय्ला तुम्मीच

यायला पैजे हं". बस्स. एक आठवड्याच्या आतच संजयनं नोकरीचा राजीनामा दिला. एम डी अ‍ॅक्सेप्ट करायला तयार नव्हते तरी त्यानं अगदी निर्धारानं मनवलं त्याना आणि मग संजय लिमयेचं जवळजवळ वानप्रस्थाश्रमी पण आत्मानंदी जीवन सुरू झालं.

सकाळी आठ वाजता सुरू होणाऱ्या ऑफीससाठी पहाटे पाच वाजता उठायला लागायचं. आता? तब्बल सहा वाजता उठायचं, दात ब्रश करून तोंड वगैरे धुवून मोजे, वॉकिंग शूज चढवायचे आणि आवाज न करता दार उघडून मॉर्निंग वॉकला बाहेर जायचं. आख्ख्या कॉँप्लेक्सच्या परिघावरून चक्कर मारली तर एक तासाची, अंदाजे ५ किलोमीटर इतकी चाल व्हायची. साडेसातला घरी यायचं तेव्हा धनंजयच्या लंचच्या डब्याची आणि सुजयच्या टिफिनची तयारी करायला श्रीलेखानं सुरुवात केलेली असायची. घामानं भिजलेला टीशर्ट काढून पाच एक मिनिटे शवासन करून उठेपर्यंत धनंजयची अंघोळ वगैरे आटपायची. ब्रेकफास्टसाठी तो टेबलावर येईपर्यंत संजयचा पहिला उकळता वाफाळणारा चहाचा टंपर टेबलावर ठेवला जायचा संजयची आंघोळ आटपून तो चहाला येईपर्यंत 'घेणेबल' टेंपरेचर येण्यासाठी म्हणून.

"बाबा, निघतो आता. हॅव अ गुड डे. दगदग करू नका. रिलॅक्स करा" असं म्हणून धनंजय लॅपटॉपची बॅग खांद्यावर आणि डब्याची पिशवी हातात घेऊन जायला निघायचा. खुर्चीवर मांडी जमवत

बसून न्यूजपेरमधल्या हेडलाईन्सवर नजर टाकता टाकता तजेलदार बनवणारं ते देवदुर्लभ कषायपेय एक घोटभर घशात उतरेपर्यंत नातू सुजय मांडीवर गाल घासत “आबा, मला चाहा? एक्दाच्हांऽऽ! ” असं म्हणत चहाच्या खंडणीची मागणी करायचा. “सुजय, चहा प्यालास तर काळा होशील” या आईच्या धमकीला गुंडाळून ठेवत “एक्दाच्हांऽऽ! ” म्हणत दोन वेळा त्याला एक एक चमचा चहा पाजण्यात अवर्णनीय आनंद मिळायचा संजयला. मग “थँक्यू आबा” म्हणत तो शाळेच्या तयारीसाठी अगदी नाखुषीनं स्वत:ला आईच्या स्वाधीन करायचा.

आता वेळ व्हायची सव्वा आठ म्हणजे प्रमिलाच्या आंघोळ आटपून टेबलावर यायची. बसता बसता ती “काय हो, मला नाही का उठवायचं वॉकला जाताना. मी पण आले नसते का?” असं म्हणायची. ती वॉकला कधीच येणार नसायची हे अगदी निर्विवाद सत्य आहे तरी पण संजय “सॉरी बुवा. विसरून गेलो अगदी. आता उद्या नक्की” असं म्हणायचा.

श्रीलेखा प्रमिलेला तिची कॉफी देत म्हणायची “आई मी सुजयला शाळेत सोडून येते. तवर मोलकरीण आली तर पहिल्यांदा केरवारा आटपून घ्यायला सांगा हं म्हणजे आबाना देवपूजा करायला बरं.” अशा खेळीमेळीच्या प्रसन्न वातावरणात सुरू झालेला दिवस नंतर पूजा, नाष्टा, सुजयला शाळेतून घरी आणणं, जेवण, प्रमिलेबरोबर वार्तालाप, वाचन, झोप, चहा-बिस्किटं, सुजयचा

अभ्यास, त्याच्याशी खेळणं, धनंजय सुजय श्रीलेखा प्रमिला यांच्यासमवेत रात्रीचं जेवण, वाचन, प्रमिलेशी सुखसंवाद आणि मग झोप असा पुढं जात जात संपायचा.

पण हे सारं गुडी गुडी प्रकरण जेमेतेम सहा महिने टिकलं.

वरकरणी प्रेमाचं असलेलं सासूसुनेचं नातं अगदी कित्त्याबरहुकुम रूपांतरीत झालं कुरबुरीत. होणारच नं. विळा-भोपळा, अहि-नकुल, आणि अगदी टॉम ॲण्ड जेरी अश्या जोड्यांमधलं सख्य तेच सासू-सुनेतलं असायचं हे तर त्रिकालाबाधित सत्य असतं. ते किती दिवस दडपून रहाणार? नाही म्हणजे, श्रीलेखा काय किंवा प्रमिला काय, वाईट कुणीच नव्हतं. फक्त जनरेशन गॅपचा प्रश्न होता. संजयला आणि धनंजयला दोघानाही ते माहित होतं. म्हणूनच ते दोघही आपापल्यापरीनं आपल्याहून दुसऱ्या जनरेशनच्या भिडूला झुकतं माप देऊन आपल्या जनरेशनच्या भिडूला सबुरीनं घ्यायचा सल्ला देत.

पण यातून परिणाम काही फारसा चांगला निष्पन्न नाही झाला. प्रमिलेची तक्रार आता श्रीलेखाबद्दल व्हायच्या ऐवजी संजयबद्दल “तुम्ही सुनेचीच बाजू घेता. माझ्याच्यानं कामाचा रगाडा रेटला जात नाही नं. म मी आता मोडीत निघणारच” अशा प्रकाराने व्हायला लागली. सुखसंवाद कमी झाले. बोलणं जरुरीपुरतंच तेही अगदी त्रयस्थाशी बोललं जावं असं राहिलं. संजयला वाटायला लागलं आपण नोकरी सोडून देऊन घोडचूक केली. कदाचित

आपण कमवत नाही म्हणून प्रमिलेला असहाय्य, परावलंबी वाटायला लागलंय आणि म्हणून अगतिकतेची भावना येत आहे काय?

पण आता पूर्वीएव्हढ्या पगाराची, प्रतिष्ठेची नोकरी सहजासहजी मिळणार नव्हती. कदाचित मिळाली असतीही, पण खरं तर संजयला आता पुन्हा त्या रॅट रेसमध्ये भाग घ्यायचा कंटाळा आला होता. थोडा आळशी झाला होता तो म्हणा नं. साहजिक आहे हो. तशी उर्वरित आयुष्यासाठीची तरतूद म्हणून केलेल्या बचतीची, फंडाची अशी बऱ्यापैकी रक्कम शिलकीत होती, काही फायदेशीर गुंतवणुकीही होत्या. मग काय जरूर होती पुन्हा नोकरी करायची अशी त्याची धारणा झाली होती. धनंजयनंही या धारणेनं मूळ धरताना संजयला पँपर करून खतपाणी घातलं होतं.

तर एकंदरीत गंमत बघा, आता बापलेकाचं नव्हे, सासूसुनेचं नव्हे, सूनसासऱ्याचं नव्हे तर अडतीस वर्षांपूर्वी प्रेमात बुडून लग्नबंधनात जोडलेलं नवराबायकोचं नातं गोठल्यासारखं झालं.

धनंजय आणि श्रीलेखा, दोघानाही कुठतरी काहीतरी चुकतंय असं वाटायला लागलं. सुनेनं सासुबाईची समजूत काढायचे निकराचे प्रयत्न चालवले आणि धनंजयने वडिलांची. पण दोघांचाही एकच धोशा, “काही बिनसलेलं नाही. आमच्यात काही बेबनाव नाही. तुम्ही उगीचच पराचा कावळा करताय.” पण मग हे खरं असलं तर अबोला कशासाठी? बोललेच एकमेकांशी तर त्यात ओलावा नाही,

किंवा मग धनंजय, लेखा आणि कमाल म्हणजे सुजयसुद्धा निरोप्याच्या भूमिकेसाठी राबवले जायचे.

कठीणच होत चाललं होतं एकंदरीत.

एक दिवस श्रीलेखानं तिच्या मनातला विचार धनंजयला बोलून दाखवला, "अहो, ऐकलं का? मी काय म्हणते? (ही सुद्धा? अर्थातच. सून झाली तरी शेवटी बाईच नं?). आबाना आणि आईना थोडे दिवस कुठतरी चांगल्या ठिकाणी प्रवासाला पाठवू या का? म्हणजे एकाद्या एग्झॉटिक ठिकाणी, मलेशिया, सिंगापूर किंवा मॉरीशस अशा? प्रवासात तरी एकमेकांची काळजी घेतीलच आणि मग तर बर्फ वितळेल की नई?" धनंजयलाही तो विचार आवडला पण तो म्हणाला, " ली, अग खुळी आहेस की काय तू? दोघंही किती आडमुठे आहेत हे काय माहीत नाही काय तुला? आई एक वेळ तयार होईल पण आबा? इम्पॉसिबल."

सर्प्राईज ओवर सर्प्राईज. संजय आणि प्रमिला दोघेही प्रवासाला जाण्याच्या प्रस्तावाने खुलले.

पण ….. एकत्र नव्हे तर वेगळे वेगळे.

संजय म्हणाला, "थँक्स. मी विचार करतच होतो. कित्येक वर्षात माझ्या कॉलेजमित्राना भेटलो नाही. छब्या दामले, मन्या सुरकर, आणखी कितीतरी. हे दोघे तर मला ठाऊक आहे गोव्यात आहेत. छब्या पणजीला, मन्या वास्कोत. येस. इट विल रिअली बी नाईस

इफ वुई कुड गेट टुगेदर फॉर सम टाईम. कर तू माझं रिझर्वेशन लवकरचं".

"माझं? एक्स्क्यूज मी! आबा, तुम्ही आणि आई दोघही बरोबर जाणार आहात". धनंजय म्हणाला.

"नो वे धनंजय! इफ आय गो, आय शॅल गो अलोन, ऑन माय ओन. दॅट्स फायनल". संजय.

"लेखा, अग मी जाईन लतिकामावशीकडं सातारला. किती वर्षांपासून बोलवतेय ती. जरा मोकळेपणी आम्ही बहिणी बसू बोलू शकू. कधीचं करता रिझर्वेशन माझं? शक्य तितक्या लवकर बघ हं. आणि हो. विमानानं नाही. मला ट्रेननं जायचंय ध्यानात ठेव". प्रमिला सुनेला म्हणाली.

"आई, भलतंच काय? आबा आणि तुम्ही दोघानी एकत्र जायचय. आयदर थायलंड, मलेशिया, सिंगापूर नाहीतर मॉरिशसला. एकेकटं मुळीच नाही." श्रीलेखा.

"गप ग. यांच्याबरोबर जायचं नाव काढू नकोस. जाईन तर एकटी, लतिकेकडं सातारला. मॉरिशस फिरीशस काही नको. त्याना जायचं तर जाऊ दे मॉरिशसला" प्रमिला.

जवळजवळ आठवडाभर चाललेल्या या वादावादीनंतर श्रीलेखा आणि धनंजय यांनी त्या दोन कमालीच्या अ‍ॅडमंट माणसांसमोर

हात टेकले आणि बाबांना पणजीसाठी रात्री आठ वाजताच्या शर्मा ट्रॅव्हल्सच्या लक्झरी बसमधे मध्ये आणि आईला साताऱ्यासाठी दुसऱ्या दिवशी सकाळी आठ चाळीसच्या कोयना एक्स्प्रेसमध्ये बसवून दिले.

***

कोयना एक्स्प्रेस डुगुडुगू चालते. हो धावते असं काही म्हणवत नाही त्या गाडीला. वाटेतल्या एकजात सगळ्या स्टेशनांवर थांबत जाते ती. पण प्रमिलेला लहानपणापासून ट्रेनचं खूपच अट्रॅक्शन होतं. लहानपणी जास्तीत जास्त वेळ झुकझुकगाडीत बसायला मिळालं की तिला अतिशय आनंद व्हायचा. त्यामुळे या कोयना एक्स्प्रेसच्या दिवसाच्या प्रवासाचा तिला काही त्रास वाटला नाही. उलट लहानपण जागं झालं आणि मजेत बाहेर बघत बघत प्रत्येक स्टेशनवर थांबण्याचा प्रवास एन्जॉय करत होती. दादर, ठाणे, कल्याण, नेरळ, कर्जत, खंडाला, लोणावळा, देहू रोड, चिंचवड, खडकी, शिवाजीनगर करत करत गाडी पाउणच्या सुमाराला पुण्यात येऊन थांबली. चार तासांच्या प्रवासामुळं नाही म्हटलं तरी वयानुसार येणारा शिणवटा जाणवायला लागला म्हणून पाय मोकळे करायला ती प्लॅटफॉर्मवर उतरली आणि चकितच झाली.

प्लॅटफॉर्मवरून धावतपळत लतिका येत होती. लतिकेनं तिला मिठीच मारली आणि धापा टाकत टाकत म्हणाली, “ताई, अगं मी सकाळीच पुण्याला आले होते जरा काम होतं म्हणून कारनं. आता

तूही उतर इथच. साताऱ्याला बरोबरच जाऊ. चार पाच दिवसांचं काम आहे माझं इथं, त्यानंतर. चल चल, घे बॅग तुझी पटकन्. गाडी सुटेल आता एव्हढयात. जास्त वेळ थांबत नाही ही कोयना एक्स्प्रेस इथं. प्रमिलेला काही विचार करायलाही वेळा दिला नाही तिनं आणि मग मुकाट्यानं बॅग घेउन प्रमिला लतिकेबरोबर स्टेशनच्या बाहेर आली.

संजयनं दुपारी घरी फोन केला. धनंजयनंच घेतला. व्वा, म्हणजे आईवडलांना बाहेरगावी पिटाळून आता राजा राणीनी सी.एल टाकलेली दिसतेय ऑफिसात. मजा करा, मजा करा थोडे दिवस, म्हातारा म्हातारी नाहीत पिटपिट करायला म्हणून.

"हॅलो बाबा, कसा झाला प्रवास?"

"तसा ठीक झाला. पण गाडी लग्झरी असली तरी झोप लागली नाही रे. म हॉटेलवर पोचल्यावर झोप काढली एक आणि मगच तुला सुखरूप पोचल्याचं कळवायला म्हणून फोन केला."

"ओके बाबा. रेस्ट घ्या आणि मजा करा जरा मित्रांबरोबर. यू डिझर्व इट. इकडची काळजी करू नका. जेवलात का?"

"हो. खरं तर आता चहा मागवला आहे मी रूमसर्व्हिसवर. पण तू माझी काळजी करत बसू नको. आम्ही नाही आहोत तोवर तरी स्वातंत्र्य एन्जॉय करा तुम्ही तिघं. म्हणजे तू, सुनबाई आणि

आमचे आताचे एम्प्लॉयर सुजयसाहेब. बरं पण आई पोचली का रे साताऱ्याला?"

"नाही बाबा. अहो आत्ताच लतिकामावशीचा फोन आला होता. तीच चारपाच दिवसांसाठी पुण्याला गेली आहे. म्हणून दुपारी पुणे स्टेशनवरच आईला उतरून घेतलं तिनं. आता दोघी बरोबरच जातील साताऱ्याला असं म्हणत होती."

"घाला म्हणावे हवा तो गोधळ आता पुढचे सात आठ दिवस."

"जाऊ द्या नं बाबा. दोघी बहिणी बरोबर आहेत ना एकमेकींच्या मग झालं तर. तुम्ही कशाचा विचार न करता तिकडं रहा निवांत बघू. आणि हो, बाबा, मोबाईल चार्जर नेलायत ना? मधून मधून फोन चार्ज करायला विसरू नका. म्हणजे टचमध्ये राहता येईल. "

"हो रे बाबा आणलाय. चार्जिंगचं नीट लक्षात ठेवीन. आणि हो. अरे धन्ना, माझ्या फोनमध्ये छब्या आणि मन्याचे फोन्स सेव्ह केलेले दिसत नाहीत. माझ्या कपाटात माझी एक फोनची वही आहे. तिच्यात बघून  सांगतोस का?"

"हो बाबा, बी ऑन लाईन."

धनंजयला पुन्हा लाईनवर यायला जरा वेळच लागला.

"बाबा, हॅलो, अहो ही नावं त्या वहीत दिसत नाहीत कुठं."

“अरे हो, तुला सांगायचं विसरलोच. छब्याचं नाव ‘छदाम’ असं लिहिलं असेल, छब्या दामलेचा शॉर्टफॉर्म. आणि मन्याचं ‘मसूर’ असं – मन्या सूरकरचा शॉर्टफॉर्म. आता बघ.”

“बाबा, तुम्ही पण कमाल करता हं. ठीक आहे मी एसएमएस करतो तुम्हाला दोन्ही नंबर.”

“बरं बरं. एसएमएस कर लगेच. आता फोन ठेवतो. जपून रहा. बाय.”

पाच एक मिनिटानी एसएमएस आला. तीन नंबर होते त्यात. छदाम, मसूर आणि लतिकामावशीचा पुण्यातला. लतिकाचा फोन द्यायची काहीच आवश्यकता नव्हती. संजयकडे होताच तो. मेव्हणीचा फोन नंबर सेव्ह नाही करायचा तर कोणाचा? काल रात्रीच तर फोन केला होता तिला. संजयने मग आणखी दोन तीन फोन केले आणि थोडा वेळ तसाच आळसावलेला काढून संध्याकाळी फेरफटका करायला म्हणून बाहेर पडून रात्री जेवूनच परतला.

**

प्रमिलेला पुण्यातला ब्रेक आवडला. का नाही आवडणार? लग्नापर्यंतचं आयुष्य तर नारायण पेठेतल्या सीताफळबागेतच तर गेलं होतं. पण आई वडलांची संमती नसताना, त्यांच्या विरोधाला न जुमानता तिनं लग्न करून पुणं सोडलं होतं ते चार वर्षांपूर्वी दोघांच्या अपघाती मृत्यूनंतर तिनं काही दिवसांसाठी भेट दिली तेव्हढच. नेदर्लंडमध्ये स्थायिक झालेल्या मोठ्या भावानं नंतर पुण्यातलं घर विकलं तेव्हाही आपला हक्क सोडत असल्याचं लेखी ॲफिडेव्हिट तिनं कुरीयरनेच पाठवून दिलं होतं. लतिकेच्या नवऱ्याच घर होतं ठुबे पार्कमध्ये. पण त्यानं आपल्या डॉक्टरी व्यवसायासाठी सातारा निवडल्यामुळं पुण्यातलं घर बंद ठेवून साताऱ्यातच आपलं वास्तव्य ठेवलं होतं. भाड्यानं दिलं नाही कारण काही ना काही कामामुळं वरचेवर पुण्याला जायला लागतं तेव्हा तिथं रहायला जागा असावी म्हणून. लतिका आणि प्रमिला आत्ता तिथंच उतरल्या होत्या. ठुबे पार्कातलं शांत वातावरण, हिरवीगार वनश्री, वाहनांची वर्दळ कमी या साऱ्या गोष्टी  प्रमिलेला खूप म्हणजे खूपच आवडल्या. इंजिनिअरिंग कॉलेज होस्टेल, मॉडर्न कॅफे आणि संभाजी पार्क या तिन्ही जागा ज्या तिला कॉलेजात असताना प्रिय होत्या त्या या घरापासून अगदी जवळ, त्यामुळं नॉस्टॅल्जियाचा अनुभव देत होतं ते घर.

धनंजयचा फोन आला तेव्हा त्याची, श्रीलेखाची आणि सुजयची चौकशी करून झाल्यावर प्रमिलानं विचारलं, “बाबांचा फोन आला होता का रे? व्यवस्थित पोचले ना गोव्याला?”

“हो आई. पोचले. पण फोन आला तोपर्यंत तरी त्यांची त्यांच्या मित्रांशी भेट नव्हती झालेली. अग, बाबांकडं फोन नंबरच नव्हते त्यांचे. मग मी त्यांच्या डायरीतनं काढून एसएमएस केले त्याना. हॉटेलात उतरले होते. हॉटेलचं नाव विचारायला विसरलो मात्र.”

“असंच आहे त्यांचं. मुलखाचा वेंधळेपणा.”

“जाऊ दे ग. आता वय झालंय त्यांचं.”

“हो आणि मी जशी काय तरुण होत चाललेय दिवसेंदिवस! ”

“असंच दिसतंय ग.” धनंजय जोरजोरात हसत म्हणाला आणि मग प्रमिलेनं, ”नीट काळजी घ्या रे आणि लेखाला सांग सुजयला मारू बिरू नकोस जेवणावरनं.” असं म्हणून फोन ठेवला.

***

संभाजी पार्क. संध्याकाळी नुसता फुलून जातो माणसांनी. फुलांपेक्षा जास्त मुलंच फुललेली असतात तिथं. आणि आजी आजोबा पण! चालतही असतात नि सगळी बाकडी अडवून बसलेलेही असतात बागडणाऱ्या मुलांच्याकडं बघत. आपलं हरपलेलं बालपण शोधत असावेत कदाचित त्यांच्यात. आणि फर्ग्युसन, पॉलीटेक्निक आणि इंजिनीअरिंग कॉलेजेदेखील ओतलेली असतात हं तिथं. रान्देव्हूसाठीचं संकेतस्थळ असतो संभाजी पार्क तेव्हा.

त्या दिवशी संध्याकाळी, - म्हणजे अहो प्रमिलेला लतिका घरी घेऊन आली त्या दिवसाबद्दल बोलतोय मी! – संभाजी पार्कानं एक वेगळंच दृश्य बघितलं. म्हणजे झालं असं की....., चला नं आपणही बघूया काय झालं ते.

डेक्कन जिमखान्याच्या बाजूच्या गेटमधून एक उतारवयातला - म्हणजे म्हातारा नाही हं – तरुण पार्कात शिरला. सगळ्या भेळीच्या, पाणीपुरीच्या गाड्या / स्टॉल्सकडं नुसती नजर टाकून पुढं येत होता. तर तेव्हाच बालगंधर्व रंगमंदिराच्या गेटमधून एक प्रमदा, म्हणजे निटनेटकी दिसणारी आणि राहणारीही, मध्यमवयीन अशी 'तरुणी' आत आली. दोघेही दोन दिशांनी चालत मधल्या कारंजाच्या जवळ आले आणि त्यांची नजरानजर झाली. म्हणजे काय तर कटाक्ष फक्त आणि चालणं सुरुच. पण चार पाच पावलं पुढं गेल्यावर ती प्रमदा थबकून मागं वळली आणि तिनं हाक मारली, "टोटल, ....... तुम्ही टोटल ना?" त्या तरुणानं हाक ऐकून मान मागं वळवली आणि बघितलं कोण हाक मारतय आपल्या कॉलेजातल्या नावानं ते. काही बोध झाला नसावा. पण म्हणाला, "मला म्हणताय? हे नाव तुम्हाला कसं माहीत? म्हणजे..., हो मी टोटलच पण..... तुम्ही? माफ करा मी ओळखलं नाही तुम्हाला."

"टोटल, अरे मी! न्यू लीफ. १९७४ बीए बॅच फर्ग्युसन कॉलेज?"

“ओ! ओ!  न्यू लीफ.... नवं पान.... पहिलं पान.....पालवी... पालवी म्हणजे न्यू लीफ. किवी पॉलिशची डबी, सॉरी, बहिण. करेक्ट. आठवलं आता.”

“बरोबर. बरीच चांगली आठवण आहे रे तुझी. फक्त डोळे अधू आहेत वाटतं.”

“नाही नाही, तसं नाही. पण मी हेन-पेक्ड हजबंड आहे. बायको बरोबर नसली तरी आजूबाजूला नजर टाकायची हिम्मत होत नाही आपली म्हणून बघितलं नाही. म्हणजेऽऽ बघितल्याचं दाखवलं नाही इतकंच.”

न्यू लीफ हसली.

“पण काय ग हल्ली असतेस कुठ? बीएनंतर गायब झालीस ती आजपर्यंत गायबच होतीस?

“हो रे. बीए नंतर लगेच लग्न झालं. मग तीन वर्षं घेतली एमए म्हणजे मा व्हायला! आता ते सर्टीफिकेटच आहे ३६ वर्षांचं. एक मुलगाही झालाय त्याला.”

“अरे वा. कुठं पुण्यातच असतेस का?”

“नाही. मी असते मुंबईला. आज आले सहज इथं चार पाच दिवसांसाठी. तुझं काय?”

“काही नाही. नुकताच रिटायर झालो. बायको, मुलगा, सून आणि एक नातू एव्हढा गोतावळा जमा करून आहे. मुंबईलाच असतो मीही.”

“छान, छान. म आता काय पुण्याचे गणपती बघायला आलायस का सगळ्यांना घेऊन?”

“छे ग. एकटाच आलोय. सहज जुन्या आठवणींसाठी.”

“हं. खरंच रे. जुने विद्यार्थीदशेतले दिवस खूप मिस करायला होतं न? माझीही तीच गत झाली होती. म्हणूनच मी पण आले इथं.”

“छान योगायोग आहे ना हा? खरं सांगू? ७६ मध्ये माझं लग्न झालं त्या आधी एका मुलीवर फिदा होतो आणि तिला भेटायचो इथं या पार्कातच. त्या आठवणीनंच मला आज इथं खेचून आणलं.”

“म्हणजे तुझ्या बायकोला चुकवून आलास ती मुलगी इथं भेटेल या आशेनं? आता इतक्या वर्षांनंतर? आणि अजून तिचं आकर्षण आहे तुला? अरे तिचंही लग्न होऊन मुलबाळ झालं असेल तिला हे विसरतोयस का? दॅट्स इन्सेन! आणि बायकोला फसवतोयस तू असं नाही वाटत तुला?”

“नाही. तिला माहित आहे. तिची परवानगी घेऊनच आलोय मी इथं.” टोटल संथपणे उत्तरला.

“महान आहे रे बायको तुझी. भेटलं पाहिजे तिला एकदा.”

“कशाला? कागाळ्या करून काडी लावायची आहे काय माझ्या संसाराला? शक्य होणार नाही ते तुला. खात्री आहे माझी.”

“अरे वा. मग तू कसला हेन-पेक्ड हजबंड? तूच बायकोची शेळी बनवून ठेवली आहेस असं दिसतंय. बरं चल. जाउ दे. बरं वाटलं तुला भेटून. मला आता निघायला हवं.” न्यू लीफ म्हणाली.

“उद्या भेटशील का परत? मी उद्या संध्याकाळी पेशवे पार्कला जाणार आहे. तिथं खाऊगल्ली वसली आहे असं ऐकलं. जरा जिभेचे चोचले पुरवून घेईन म्हणतो.....येशील?”

“पाहते. मी ज्यांच्याकडं उतरले आहे त्यांनी काही कार्यक्रम आखला नसला तर येईन.”

“बघ. येच. खूप बोलावसं वाटतंय जुन्या दिवसांबद्दल.”

“पाहते. कळवेन मी. पण तुझा फोन नंबर दे ना.” इतकं म्हणून आणि फोन नंबरांची देवाणघेवाण करून न्यू लीफनं निरोप घेतला.

तुम्ही म्हणत असाल काय आचरटपणा चालवलाय मी हा असा. पुण्यात आणि अशी नावं? पण नाही हो. तसं नाहीये. पुण्यातल्या बायकांनी काय कमलाबाई, यमुताई, मालतीबाई अशीच नावं घ्यायची असा काही नियम होता का तेव्हा? म्हणजे, आपल्या या

न्यू लीफचा जन्म झाला तेव्हा? नाहीच. पण तरीही तिच्या आईवडलांनी तिचं नाव ठेवलं होतं थोडं हटके असं हेही खरंच!

***

दुसऱ्या दिवशी दुपारच्या जेवणानंतर प्रमिला आणि लतिका अशाच गप्पा मारत पडल्या होत्या. कुठल्या कुठल्या गोष्टी निघाल्या आणि किती वेळ गप्पा मारतो आहोत दोघींनाही भान राहिलं नाही. तसं दोघींच्या वयात तीनच वर्षांचं तर अंतर होतं. त्यामुळं बहिणी कमी आणि मैत्रिणी जास्त असाच मामला होता दोघींचा. लतिका बोलघेवडी, आणि प्रमिला जरा कमी. पण प्रमिलेचं नाक मुठीत धरून हसणं आणि जिंगल बेलच्या आवाजातलं बोलणं आवडायचं लतिकेला, तर लतिकेचं बिनधास्त आणि घाईघाईचं बोलणं प्रमिलेला. मग पडल्यापडल्या चाललेल्या गप्पात चार केव्हा वाजले कळलंही नाही त्यांना. लतिकेला कोणाचा तरी फोन आला म्हणून ती उठून बाहेर गेली तेव्हा लक्षात आलं. फोन झाल्यावर लतिका म्हणाली, “ताई, अगं एक काम निघालंय. ह्यांचा मेडिकल सप्लाईज देणारा एक डीलर आहे इथं नेहमीचा. त्याच्याकडून एप्रन्स, लिनन, गॉझेस, मेडीकेटेड कॉटन रोल्स, बँडेजिस, वगैरे आमच्या हॉस्पिटलसाठी लागणाऱ्या वस्तू आम्ही घेतो. त्याचा अकाउंट तपासून यायला सांगितलंय यांनी. त्याच्याकडे जायला हवंय मला. चलतेस का तू?”

“कुठं ग?”

“अगं त्यांचं ऑफिस आहे सारसबागेजवळ.”

“चल नं. येते मी. पण मला सोड सारसबागेत नि तू जा त्या सप्लायरच्या ऑफीसात. अनायासे तिकडं जातोच आहोत तर तळ्यातल्या गणपतीचं दर्शन पण घेईन. किती तरी वर्षं झाली मला तिथं जाऊन. निवांत बसेन म्हणते थोडा वेळ त्या परिसरात. तुझं काम झालं की तू परत घरी ये. मी येईन रिक्षानं. काळजी नको करूस माझी. चुकणार नाही.”

“खात्री आहे? बघ हं. कसली गॅरंटी देऊ नकोस पुण्याच्या माहितीची. पुणं अवाढव्य आणि अस्ताव्यस्त पसरलंय. पूर्वीचं आटोपशीर पुणं नाही राह्यलंय आता.”

“काळजी करू नकोस. आठवतंय नं मोपेडवरनं फिरायचे मी बिनधास्त तोंडावरून फक्त डोळे उघडे राहतील असा स्कार्फ बांधून. ‘निघाली बघा टेररीस्ट’ असं म्हणायचात तू आणि किरणदादा मला. आठवतंय.”

“हो ग. डेअर डेव्हिल होतीस तू तेव्हा खरी.”

“आणि दादाचा एक मित्र होता तो म्हणायचा झाशीच्या राणीचा घोड्यावरचा पुतळा आता आउटडेटेड झालाय, तिथं हिचा, - म्हणजे माझा हं - मोपेडवर स्वार आणि पुढचं चाक स्टंटबाजीत हवेत उचलून धरलेला असा पुतळा बसवायला हवा त्या जागी.”

दोघीही मनापासून हसल्या, एक गडगडाटी आणि दुसरी किणकिणाटी जिंगलबेल आवाजात, नाक मुठीत पकडून.

प्रमिलेला सारसबागेत गरवारे बाल भवनाजवळ सोडून आणि फोन करत रहाण्याबद्दल बजावून लतिका तिच्या कामासाठी निघून गेली. प्रमिला फिरत फिरत सारस बागेत शिरली. आणि हळूहळू इकडे तिकडे बघत बघत तळ्यातल्या गणपतीच्या देवळाशी आली. देवळाच्या पायऱ्या काही जास्त नाहीत. पण त्याही चढताना प्रमिलेला लक्षात आलं की आता तेव्हढही चढणं कठीण जातंय. वय जाणवायला लागलंय आता आपलंही. गुढग्यांवर हात धरत धरत ती पायऱ्या चढून सभामंडपात गेली. गणपतीच्या दर्शनानं मनातले सात्विक भाव जागे झाले आणि त्यात भरून आलेल्या पायातली दुखी लोपून गेली. शांतपणे, मनोभावे देवाचं दर्शन घेऊन आणि त्याची प्रार्थना करून प्रमिला थोडा वेळ देवाच्या सान्निध्यात बसावं म्हणून भिंतीचा आधार धरत फरशीवर खालीच बसली. बाक होते तरी. गम्मत आहे ना? सभामंडपात जरी कडेने बसायला बाकांची योजना केलेली असली तरी मन खालीच बसायला सांगतं. देवासमोर सारा अहंकार गळून पडतो आणि आपण नम्र होतो. मग देवासमोर उच्चासनावर बसणार कसं? खाली बसून भिंतीला टेकल्याटेकल्या प्रमिलेची नजर छताकडे गेली. छताला लागून भिंतींवर चारी बाजूला अथर्वशीर्षाचे श्लोक लिहिलेल्या फरश्या बसवल्या होत्या. तोंडपाठ असलं तरीही वाचत वाचत प्रमिलेनं

अथर्वशीर्ष म्हटलं आणि "येते रे बाबा, गणेशा, कृपा असू दे आमच्या सगळ्यांच्यावर" असं म्हणत सावकाश पायऱ्या उतरल्या. देवळाभोवतालच्या तळ्याची दशा झालेली पाहून तिला खूप वाईट वाटलं. कारंजी बंद तर होतीच, मधून मधून डबक्यांसारख्या दिसणाऱ्या शेवाळलेल्या पाण्यात मोजकीच पांढरी कमळं आणि निरिच्छ किंवा कंटाळल्यासारखे, मारून मुटकून उभे केल्यासारखे दिसणारे चारदोन करकोचे (सारस पक्षी) बघून प्रमिलेला हळहळ वाटली. आपण पूर्वी यायचो तेव्हा किती रम्य, प्रसन्न वाटायचं इथं! हळू हळू पावलं टाकत दुतर्फा असलेल्या बोगनवेलींच्या कमानींखालून चालत ती रस्त्यावर आली. तो रस्ता आता खाऊगल्ली, किंवा सारसबाग चौपाटी या नावाने पार बकाल झालेला होता. कदाचित रात्री गजबजला जात असेल तेव्हा बघायला बरा वाटत असेल. आता साडेसहा, सात वाजायला आले होते, नुकतीच कुठे वडापाव, मिसळ, चायनीज, इटालियन खाणी विकणारे स्टॉल्स उघडायला सुरुवात होत होती. प्रमिलेनं पर्समधून फोन काढला आणि नंबर 'लावला'. हो. मोबाईल फोनवर नंबर 'डायल केला' असं म्हणता येत नाही. पण मग म्हणायचं तरी कसं? कीबोर्डवर नंबर टाईप केला असं? छे. नाही बरोबर वाटत. त्यापेक्षा नंबर 'लावणं'च बरं.

* * *

"झालं का ग तुझं काम?"

“नाही ग अजून. आणखी पाउण एक तास तरी लागणार आहे. तुझं फिरून झालं असलं तर नीघ तू.”

“बाई ग, माझ्याकडं घराची किल्ली कुठं आहे? त्यापेक्षा असं करते. भूक लागलेय. तेव्हा इथंच खाऊगल्लीत खाऊन घेते थोडं काही तरी. तुझं काम झालं की तू घरी जा. म्हणजे मी आल्यावर किल्लीचा प्रॉब्लेम रहाणार नाही. काळजी करू नकोस. आठ साडेआठ पर्यंत घरी असशील ना तू? मग मी येतेच.”

“ठीक आहे. ए, ताई, रगडा पॅटीस खा ग. मिलन भेळमध्ये चांगलं असतं.”

“ठीक आहे. ठीक आहे. ठेवते आता.”

ओळखलंत ना? लतिका आणि प्रमिला या दोघींचं बोलणं होतं हे फोनवरलं.

* * *

“कुठं आहेस?”

“पेशवेपार्कच्या गेटमध्ये.”

“दिशा? आत जायची की बाहेर यायची?”

“आता वाजलेत सात. गेला अर्धा तास दिशा आत जायची होती आता बाहेर यायची आहे.”

“चौपाटीवरचा गुंजन नारळ पाणीवाल्याचा स्टॉल दिसतोय तिथून?”

“अं....गुंजन?.....हं दिसतोय. एक बाई आहे त्याच्या समोर.”

“मीच आहे ती. तिथं ये. दोन मलईवाले नारळ द्यायला सांगते.”

“ग्रेट. आलोच.”

हे संभाषण होतं न्यू लीफ आणि टोटलमधलं.

टोटल आणि न्यू लीफ, दोघानाही नारळ पाण्याचं कौतुक होतं. अगदी पूर्वीपासून. खास करून करवंटीच्याच तुकड्याने आतली मलई खरवडून खायला आवडायचं दोघांना. खरं तर ही सवय मूळची न्यू लीफची. टोटलला संभाजी पार्कात पूर्वी मिळणाऱ्या नीरेची लज्जत जास्त आवडायची. पण मग न्यू लीफच्या नादाने त्याला हा कोको(नट)कोला आवडायला लागला होता. आणि त्या सुमारालाच कधीतरी ते नीरा विक्री केंद्र बंद झाल्यावर मग काय? नारळपाणीच. असो. तर तहान भागल्यानंतर थोड्या, म्हणजे खूपच, जुन्या आठवणी घोळवल्या गेल्या. रगडा पॅटीस, वडापाव, इडलीचटणी, या गोष्टी रिचवल्या गेल्या. आणि मग न्यू लीफनं सरळच प्रश्न केला, “टोटल, सुखी आहेस का रे?”

“म्हणजे? का विचारतेस असं?”

“नाही रे, उगीचच आपलं वाटलं तू सुखी नसावास संसारात म्हणून.”

“का नसेन? अग, सुंदर, समजूतदार, आणि माझ्यावर अपार प्रेम करणारी बायको मिळालेय मला. का का सुखी असणार नाही मी?”

“म खरं सांग, बायकोला सोडून इथं मैत्रिणीला भेटायला यायचा मोह तुला का झाला?”

“कमाल करतेस तू न्यू लीफ. मैत्रीण भेटली तरी माझ्या बायकोला मी कसा दूर करेन? आपण काही हिंदी सिनेमात जगत नाही. वास्तवात जगतो आहोत. आणि वास्तवात तसं काही होत नाही. समजलीस? माझी बायको, माझा मुलगा, सून आणि नातू, सगळे अगदी जीवापाड प्रेम करतात माझ्यावर. आणि मीही त्यांच्यावर.”

“हो? टोटल, ती तुझी मैत्रीण कोण होती रे? मी ओळखते का तिला?”

“अगं होती तर तुझ्याच कॉलेजात, अगदी तुझ्या वर्गातच. तू नक्की ओळखत असणार तिला. बरं पण तुझं काय? तुझाही एक मित्र होता. मला माहित होता तो. भेटतो का ग तुला कधी?”

“हो, नेहमी भेटतो. मुंबईतच असतो. आम्ही रहातो ना? ते त्याचंच घर. त्यानंच दिलंय आम्हाला ते.”

“अरे? कमाल आहे. आणि तुझ्या नवऱ्याला चाललं ते?”

“टोटल, अरे माझा नवरा लाख माणूस आहे. आणि मी लग्नाआधीच त्याला सांगितलं होतं आमच्या प्रेमाबद्दल. काहीही न लपवता. अगदी माझ्या घरच्यांचा मला कसा विरोध होता त्याच्यासकट. त्यानं जेव्हा ते सगळं ऐकलं तेव्हा काय म्हणाला होता माहीत आहे? म्हणाला, ‘आय हॅव जस्ट वन क्वेश्चन. विल यू मॅरी मी? नाऊ? जस्ट नाऊ अँड हिअर?” याच गणपतीच्या देवळात आलेले होतो आम्ही तेव्हा.”

“मग?”

“मग काय? मी हो, हो, असं म्हणाले नि तिथल्या तिथंच, खरोखरच्या देवा ब्राम्हणासमोर आम्ही एकमेकांना नवरा बायको म्हणून मनोमन स्वीकारलं. त्याच दिवशी सब रजिस्ट्रारच्या ऑफिसात जाऊन ३० दिवसांची नोटीसही दिली.”

“दोघांच्या घरचे?”

“विरोध. माझ्या घरी कट्टर, त्याच्या घरी थोडासा. पण लग्नाला दोन्हीकडून कोणी आलं नाही. आमचे  दोन मित्र हजर राहिले साक्षीदार म्हणून बस्स! असं झालं लग्न! ”

“भारीच ग. मानलं तुम्हाला दोघांना. आणि तुझ्या मित्रालाही.”

“दोघाना म्हण, त्यात मित्रही आलाच.”

“म्हणजे?”

“म्हणजे? यू ईडियट, त्या मित्राशीच तर लग्न केलं मी.”

“न्यू लीफ, कमाल हं तुझी! कमालच म्हणायची.”

“बरं, चल आता निघते. आठ वाजून गेलेत. उद्या किंवा परवा परत जाईन म्हणते मुंबईला. तिथल्या सगळ्यांची खूप आठवण येतेय.”

“हो? माझाही तोच विचार आहे. माझा नातू तर दर फोनवर विचारतो, ‘आबा, कधी येणार परत? या नं, आत्ताच या नं.” खूप गोड आहे ग छोकरा.”

“अरे वा. पण, ए, टोटल, अरे मुंबईतही भेटूया का आपण? पत्ता दे न तुझा तिथला.  माझाही मी देते आणि आपण पुन्हा नक्की भेटूया.”

“ओके. मी एसएमएस करतो तुला माझा पत्ता. चल. निघूया आता. साडे आठ झालेत. तू एकटी जाशील? की मी येऊ सोडायला?”

“जाऊ शकते. पण येशील? ठुबे पार्कमध्ये राहते मी.”

“हो. त्यात काय? मलाही त्या बाजूलाच जायचंय. बालगंधर्वजवळच आहे हॉटेल माझं.”

“थँक्स. चल तर मग. निघू या.”

टोटल आणि न्यू लीफने एक रिक्षा केली.

***

“आलीस का?”

“हो ग. आले. तू कधी पोचलीस? अग अर्धा तास झाला. आठ साडे आठला पोचले तर तू नव्हतीस आलेली. चल, जेवून घेऊया.”

“छे ग, माझं खाणं झालंय खूप. तू जेव. मी बसते नुसती तुझ्याबरोबर.”

“काय एव्हढं खाल्लस?”

“खूप काय काय. एक जुना मित्र भेटला ग तिथं. त्याच्याबरोबर मग गप्पा करता करता बरंच काय काय खाल्लं आम्ही दोघांनी.”

“हो का? कोण मित्र ग? तो मोपेडस्वार पुतळावाला?” लतिकेनं हसत हसत विचारलं.

“बरोबर. कसं ओळखलंस ग तू?”

“त्यात काय? ताईबाई, तेव्हाही तुम्ही अशाच त्याच्याबरोबर वेळ काढायच्च्यात ते मी विसरले नाही. काय म्हणत होता पुतळाबहाद्दर?”

“काही नाही ग. अशाच इकडच्या तिकडच्या आठवणी. कॉलेजच्या वेळच्या. बरं, लते, मी काय म्हणते? उद्या निघावं म्हणते मुंबईला परत जायला.”

“का? अगं साताऱ्याला जायचंय न आपल्याला?”

“नको ग आता. तुला भेटायचं होतं ते तू इथंच भेटलीस मग आता साताऱ्याला जायचं काही कारणच उरलं नाही.”

“आणि धैर्यशीलना भेटायचं नाही? काय म्हणतील ते?”

“तू सांग धैर्यशीलना. मी पुढच्यावेळी नक्की येऊन भेटेन म्हणाव. नाहीतर तुम्हीच दोघं या आता मुंबईला. खूप दिवस झाले तुम्ही येऊन. आणि आता सुजयची, धन्नुची, लेखाचीही फार आठवण येतेय ग.”

“आणि जीजाजींची? त्यांची नाही आठवण येत?”

“त्यांची काय आठवण यायची? बसलेत ना गोव्यात जाऊन मजा करत मित्रांबरोबर.”

“हो का? अस्सं आहे का? ठीक आहे. मं असं कर, परवा शनिवारी जा डेक्कननं. बसवून देते तुला मी.”

लतिकेचं जेवण झालं. आणि मग दोघी मैत्रिणी झोपायला गेल्या.

प्रमिला शनिवारी सकाळी सव्वासातच्या डेक्कन क्वीनने निघून मुंबईला घरी पोचली साडेआकराच्या सुमाराला. गम्मत म्हणजे संजयही त्याच दिवशी दुपारी सह्याद्री एक्स्प्रेसने आला. घरी पोचला तेव्हा साडेबारा झाले होते.

घरी प्रमिलेचं श्रीलेखानं आणि संजयचं धनंजयनं स्वागत केलं. पण दोघांनाही काही न कळवता अचानक आणि असे पाठोपाठ परतलेलं बघूनही काही आश्चर्य दाखवलं नाही त्यांच्यातल्या कुणीही.  जेवणं झाली, वामकुक्षी झाली आणि मग चहा घेता घेता धनंजय म्हणाला, ”बाबा, तुम्ही म्हणजे अगदी टोटली चकित केलंत हं आम्हाला.”

संजय थोडा चपापला. तेव्हढ्यात श्रीलेखेनंही टिपण साधलं, “पण आबा, आई, आता यू टेल अस, या आउटिंग्जनंतर आर यू रिअली टर्निंग अ न्यू लीफ इन द लाईफ? टोटली? की पूर्वीसारखं खडाष्टक चालूच रहाणार आहे मागील पानावरून पुढं?”

आता तर संजयबरोबर प्रमिलेचीही पाळी होती मनातल्या मनात आश्चर्यचकित होण्याची. ‘टोटल, न्यू लीफ, हे शब्द या दोघांनी

सहजगत्या वापरलेत की काही तरी समजलंय या दोघांना? कसं? लतिका? नाही. ती नाही हे सांगणार याना. मग?

बाबा म्हणाले, “अरे, आमची भांडणं, अबोला, हे सगळं खरंच होतं रे. खोटं नव्हतं त्यात काही. पण मुळातलं आमचं प्रेमही होतंच न जोडीला? तुम्ही कल्पनेनं आमच्या वयात शिरून बघा, या सगळया गोष्टी मूळचं प्रेम  खोडून नाही टाकू शकत. पण कुणी तरी म्हटलं आहे नं ‘विडा न रंगे काताविण’ तसाच संसारही असतो. रुसवे फुगवे, भांडण, कुरबुरी, अबोले नि परत मनधरणी, दिलजमाई या सगळ्या, सगळ्या गोष्टींनी रंगत असतं संसाराचं मघई पान.”

“हो पण बाबा, चुना तुम्ही पानाला नाही, आम्हाला लावायला गेलात नं! त्याचं काय?” धनंजय हसत म्हणाला.

“तसा आमचा उद्देश नव्हता हं मुळात. अरे प्रेमालाही वय असतं. तुम्ही दोघेही घरात नसताना झालेल्या दिलजमाईत आम्ही ठरवलं, थोडं पूर्वीचं, तरुणपणीचं प्रेम पुन्हा अनुभवूया. प्रेमाच्या आमच्या त्या तरुण वयात तुमचा प्रवेश नव्हता ना झालेला. मग आताही थोड्या दिवसांसाठी तुम्हाला बाजूला करून ते प्रेम जगून पुनरानुभूति घ्यायची ठरवली आम्ही.”

“हो पण एकत्र चोरून दूध प्यायला म्हणून एकेकट्यानं तिकडं गेलात आणि भांडं इकडं फुटलं. होय ना? बाबा, गोव्यातून येताना

बेबेन्का, दोदोल, निदान काजू तरी आणले असतेत ना. पण आणलंत काय? विश्रामबागवाड्याजवळच्या घोडकेची आंबा बर्फी आणि डेक्कनवरल्या ‘आमची कुठंऽऽही शाखा नाही’ वाल्यांची बाकरवडी. आलं नं मांजर इथं पोत्यातून बाहेर?”

“खरंय रे. घोटाळा झाला खरा. पण अरे, टोटल, न्यू लीफ ही चित्तर कथा तुमच्या पर्यंत कशी पोचली?”

“तुमचाच गाफीलपणा बाबा! तुमचाच गाफीलपणा! तुम्ही फोनची डायरी मला बघायला सांगितलीत. तेव्हा मला एक चिठ्ठी सापडली. तुम्ही सांगितलेलं  छदाम हे नाव त्या चिठ्ठीतही होतं. मी वाचली ती. ली, जरा आणून दाखव ग ती चिठ्ठी यांना. खरं तर दोन चिठ्ठ्या, माझ्या खणात मिळतील तुला. दोन्ही आण. मग होईल दूध का दूध और चुनापानी का चुनापानी. हं हीच. बाबा, आई, ऐका हं वाचतो,

“टोटल, किवीपॉलिशशी माझं बोलणं झालंय. ही इज अल्सो हॅपी फॉर यू अ‍ॅज वेल अ‍ॅज फॉर न्यू लीफ. फक्त तो येऊ शकणार नाही परवा. नंतर शुभेच्छा द्यायला जाईन असं म्हणालाय. मसूर आणि मी नक्की येऊ. न्यू लीफलाही सांग म्हणाव वुई आर देअर विथ हर टू सपोर्ट हर ऑल द वे.

छदाम.”

मग मी सरळ छदाम, आय मीन छबाकाकाना फोन लावला. हा काय प्रकार आहे ते विचारण्यासाठी. मला वाटतं तुमचा फोन त्यांच्याशी त्याआधी नुकताच झाला होता आणि तुम्ही गोव्याला यायचं कॅन्सल केलय हे त्याना सांगितलं होतंत.  मग मी जेव्हा म्हटलं की नाही, बाबा गोव्यातच आहेत एकटेच आणि हॉटेलात उतरलेत आणि त्यांच पत्र वाचून दाखवून हा प्रकार काय म्हणून विचारलं तर ते एकदम उसळलेच. दोनचार शेलकी विशेषणं तुम्हाला लावून म्हणाले “मं तुझा बाप मला खोटं का सांगतो? नक्की कायतरी गेम खेळतोय तो. बायकोला सोडून हा एकटा फिरतोयच कसा. अरे अडतीस वर्षांपूर्वी उघडलेलं नवं पान आता मिटवतोय म्हणजे काय? धन्ना, थांब तू. उद्या मी तुला माझ्या उत्तराआधीची त्याची आलेली चिठ्ठी पाठवतो स्कॅन करून. तो आला परत म्हणजे टाक त्याच्या तोंडावर. आणि बजाव त्याला. म्हणाव न्यू लीफची माफी माग नाहीतर या छदामशी गाठ आहे.”

आता दुसरी, म्हणजे खरं तर लिहिली गेलेली पहिली, चिठ्ठी वाचतो.

“छदाम, आम्ही दोघं म्हणजे न्यू लीफ आणि मी, आयुष्याचं पूर्णपणे नवं पान उघडतो आहोत परवा. मागची सगळी बंद करून. टायटल आहे ‘टिल डेथ डू अस अपार्ट.’ तेव्हा त्याचे साक्षीदार व्हायला तुला आणि मसूरला बोलावतो आहे. किवी पॉलिश रागावला नसला तरी आईवडलांच्यापुढं त्याच्यातली चमक

नाहीशी झालेली असते. म्हणून तो येणार नाही. तू आणि मसूर दोघेही याल याची खात्री आहे. कार्पोरेशन बिल्डींगमध्ये सब-रजिस्ट्रारचं ऑफिस आहे माहित आहेच तुम्हाला. सकाळी आकरा वाजता. परवा. म्हणजे २४ डिसेंबर ७६. सी यू देअर. आहेर नकोत. फुलं नकोत. हवे आहात फक्त तुम्ही.

टोटल.

बाबा म्हणाले, “पण हे झालं दोन आणि दोन पाच मोजणं. न्यू लीफ म्हणजे ही आणि टोटल म्हणजे मी हा शोध नाही एक्स्प्लेन होत इथं.”

“बाबा, ‘पारुल’. म्हणजे फूल, जे ब्युटीफुल, ग्रेसफुल इत्यादी असतं पण fool नसतं. आता लक्ष्मीकांत वीरकरांनी आपल्या मुलीचं हे असं हटके नाव ठेवताना विचार थोडाच केला होता की आपलं हे फूल पुढं कॉलेजातला जो टारगट पोरांचा ग्रुप जॉईन करणार आहे तो तिच्या नावाच्या पा.ल.वी. या अद्याक्षरांवरून पालवी – ‘न्यू लीफ’ असं तिचं बारसं करेल? पण झालं खरं तसं. ते नाव तिला आवडलं. आणि चिकटलंही कॉलेज संपेपर्यंत. आणि अहो आईनं माहेराचं नाव टाकलं असलं तरी माहेरचं नाव नाही ना लपवलं? आजच्या सौ. प्रमिला संजय लिमये या पूर्वाश्रमीच्या पारुल लक्ष्मीकांत वीरकर उर्फ पालवी ऊर्फ नवं पान ऊर्फ न्यू लीफ हे ओघानं आलच नाही का?”

“ब्रिलियंट! मिस्टर शेरलॉक होम्स. मग व्हॉट अबाउट टोटल?”

“एलीमेंटरी, माय डियर मिस्टर लिमये, आय मीन बाबा. संजय पूर्णेन्दु लिमयेमध्ये संपूर्ण लिमये सामावलेतच ना? संपूर्ण म्हणजेच टोटल! .........अँड नाऊ आय मस्ट गो फॉर माय वॉक.” म्हणत धनंजयनं टेबलावरली कॅप उचलून डोक्यावर ठेवली आणि तो बाहेर पडला.

# ३. अल्लाकाका

अल्लाकाका म्हणजे माझा पैगंबरवासी बालमित्र नूरमहंमद इलाहीबक्ष मणेर. अतिशय सभ्य, विनम्र, हसतमुख आणि मदत करायला सदैव तत्पर असा होता हा माझा मित्र. राजाराम रोडवर घाटगे अँड पाटील यांच्या शोरूमच्या जवळ असलेल्या फेमस बेकरीचे मालक (पै.) एच एम शिकलगार यांचा हा भाचा. त्यांच्याकडेच सदर बाजार येथे रहायचा. शिकत असतानाही रोज सायकलला बेकरी मालाने भरलेल्या दोन हिरव्या कॅनव्हास कापडाच्या पिशव्या अडकवून डिलिव्हरी द्यायला जायचा. ताजे पाव, बटर्स, वर्क्या असा माल असायचा. त्याची ती हँडलला दोन्ही हात मधे धरून वाकून बसून सायकल चालवायची पोज अजून डोळ्यांपुढे येते. संध्याकाळी थोडा उशिराने तो दादांकडे, म्हणजे माझ्या वडिलांकडे, इंग्रजी शिकायला यायचा. त्याला 'अल्लामिया' हे नाव दादानीच प्रेमाने दिले होते आणि तेच आमच्याकडे कायम राहिले. अल्लामिया मला 'आप्पी' म्हणायचा कारण तेव्हा लहान असलेली माझी पुतणी माधुरी तशी हाक मारायची म्हणून. पुढे माझी पत्नी कै. कांचन आणि मुले सिद्धार्थ व परिक्षितही त्याला अल्लाकाका असे म्हणायचे आणि तोही प्रेमाने हसत हसत ओ द्यायचा. कधी कधी तो मुलाना सायकलवर बसवून आपल्या घरी घेऊन जायचा आणि स्वतःच्या नासिर अणि नियाझ या दोन मुलांसारखेच या दोघानाही 'आ बेटे, बैठ यहाँ, खा बेटे' असे प्रेमाने

म्हणत जवळ घेऊन कुरवाळत भरवायचा. त्याची पत्नी हजराबी ही देखील अतिशय प्रेमळ आणि मितभाषी. घरी ईदला खीर कुर्मा आणि बिर्याणी बनली की अल्लाकाका डबा घेऊन सायकलवरून आमच्या घरी येऊन द्यायचा. अगदी मी सौदी अरेबियाला गेल्यानंतरसुद्धा हा परिपाठ चालू राहिला. आमच्याही घरून दिवाळीचा फराळ मुले त्यांच्या घरी सायकलवरून जाऊन देऊन यायची. हिंदु आणि मुसलमान असा फरक आम्हा कुणालाही कधीच जाणवला नाही.

मला वाटते मॅट्रिक पास झाल्यानंतर अल्लाकाका आर्मीत भरती झाला. काही दिवस पुण्याला खडकी येथे आणि नंतर उत्तर भारतात कुठेतरी त्याचे पोस्टिंग झाले. कुठे आहे ते तो कळवू शकत नसायचा. ५६ एपीओ असा पत्ता देऊनच त्याची पत्रे यायची. मी उत्तरही त्यांचे नाव 'एन आय मणेर, मेडिकल युनिट, ५६ एपीओ अश्याच नाव-पत्त्यावर पाठवायचो. मला वाटते त्याच्या शिक्षणामुळे आणि उत्कृष्ट सेन्स ऑफ ड्यूटीमुळे पुढे त्याला लेखनिकांमधे बदलण्यात आले. पुण्यात असताना तो मला भेटायला यायचा. मी त्यावेळी पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजात शिकत होतो. एकदा मला घरून येणाऱ्या मनीऑर्डरला वेळ झाला आणि पैश्यांची आवश्यकता होती. अल्लाकाका आला होता तेव्हा. माझी अडचण समजताच त्याने काहीही न बोलता आपल्या खिशातून पैसे काढून माझ्या हातात ठेवले आणि म्हणाला 'आप्पी,

हे तुमचे आहेत. परत करायचा विचार आणू नका मनात'. नंतर देखील  कोल्हापुरातला माझा कॉंट्रॅक्टरचा व्यवसाय अडचणीत आला असताना त्याने मदतीचा हात पुढे केला होता. बंगला देश युद्धात अल्लाकाका ॲक्टीव्ह ड्युटीवर होता. पाकिस्तानी जनरल ए.ए.के. नियाझी यांनी शरणागती लिहून दिली त्यावेळच्या समारंभात अल्लाकाकाला त्या ठिकाणी उपस्थित रहायची संधी मिळाली होती.

अल्लाकाकाने मला वाटते १६/१७ वर्षे आर्मीत नोकरी केल्यानंतर एक्स्ट्रीम कॉम्पॅशनेट ग्राउंड्स् वर आर्मीतून डिस्चार्ज घेतला. त्यानंतर मिलिटरी बोर्डातर्फे कोल्हापुरातच महाराष्ट्र राज्य वीज मंडळात त्याला क्लार्कची मोकरी देण्यात आली. त्या सुमारास त्याने राजारामपुरीतच दुसऱ्या गल्लीत छोटेसे घर बांधले. आता अल्लाकाका, हजराबी आणि नियाझ, नासिर हे कित्येक वर्षांनंतर समाधानाने एकत्र राहू शकले.

याच सुमारास मी माझा कोल्हापुरातला नुकसानीतला व्यवसाय गुंडाळून आखाती देशात नोकरी साठी जाण्याचा निर्णय घेतला. अल्लाकाकानी आणि त्याच्या मुलानी देखील माझ्या माघारीही आमच्या घराशी जिव्हाळ्याचे संबंध कायम ठेवले. अल्लाकाका कांचनला नेहमी धीर द्यायचा. म्हणायचा, 'वैनी तुम्ही काळजी करू नका. आप्पी तिकडे नक्की यशस्वी होतील आणि तुम्ही

आज जरी अडचणीना तोंड देत आहात तरी एक दिवस तुम्ही इतक्या समृद्धीचे दिवस पहाल की आत्ता तुम्ही ज्या तुमच्या भेगाळलेल्या पायांना साधे तेल लावत बसला आहात त्याऐवजी नीव्हियासारखे महागडे क्रीम तुम्ही मुबलकपणे त्या पायाना चोळाल. माझे हे शब्द तुम्ही लक्ष्यात ठेवा.'

सौदी अरेबियातून मी पहिल्यांदा सुटीवर घरी आलो तेव्हा अल्लाकाकासाठी नमाझ पढताना वापरायचे जाजम (मुसल्ला) आणि मित्राकरवी खास मक्केतून आणवून घेतलेले अत्तर नेले. त्या दोन्ही गोष्टी मस्तकाला लावून अल्लाकाका म्हणाला, 'आप्पी, या मुसल्ल्यावर मी नमाझ पढ्ल्यामुळे जे पुण्य माझ्या खाती जमा होईल ते सारे तुम्हाला'.

बरीच वर्षे गेली, माझा अखाती देशातला मुक्काम वाढतच गेला आणि एक दिवस कांचनच्या पत्रातून मला समजले की हा माझा जिवाभावाचा मित्र अल्लाकाका एकाएकी हृदयविकाराने खऱ्याखुऱ्या अल्लाला प्यारा झाला. मी हजराबीना सांत्वनाचे पत्र पाठवले आणि नंतरच्या सुटीत आलो असताना त्यांना व मुलांना जाऊन भेटलो. अल्लाकाका गेल्यानंतर कांचनने नीव्हिया क्रीमची आठवण सिद्धार्थला मुद्दाम सांगितली आणि तेव्हापासून ती कायम नीव्हीयाची एक डबी केवळ पायांना लावण्यासाठी म्हणुन घरात ठेवायची.

महाराष्ट्र राज्य वीज मंडळाने अल्लाकाकाच्या जागी त्याच्या मोठ्या मुलाला - नियाझला पदवीधर झाल्यानंतर  नोकरी दिली. दुसरा मुलगा नासिर ऑटोमोबाईल इंजिनीअर झाला. हजराबींनी दोन्ही मुलांवर अल्लाकाकाला जन्नतमध्येही गौरवास्पद वाटतील असे चांगले संस्कार करून वाढवले.

आम्ही जिव्हाळ्याचे मित्र होतो. तरी, आणि वरच्या लिखाणात एकेरी उल्लेख केला असला तरीही, आम्ही एकमेकाना प्रत्यक्षात कधी एकेरी संबोधले नव्हते. म्हणून, अल्लामिया, तुम्हाला मी इथून सलाम करतो. भगवन्, हा मित्र मला जन्मोजन्मी लाभावा.

# ४. केळकर मास्तर

१९४७-४८ सालची गोष्ट आहे ही. मी कोल्हापुरात ज्या शाळेत शिकत होतो तिचे नाव होते सदानंद विद्यालय. हे शाहूपुरीत ब्रँच राजाराम हायस्कूलच्या समोर एका दुमजली बिल्डिंगमध्ये होते. मला आता आठवते त्याप्रमाणे शाळेच्या संचालिका - ज्याना तेव्हा हेडमिस्ट्रेस अशा अवघड शब्दाने ओळखले जायचे - होत्या श्रीमती हेमलताबाई कदम. इतर चार शिक्षकांची - म्हणजे मास्तरांची - नावे आठवतात ती म्हणजे एक होते पालवणकर मास्तर. दुसरे नाना घाटगेमास्तर, तिसरे भस्मेमास्तर आणि चौथे केळकरमास्तर. कदमबाई बिगरी (म्हणजे हल्लीची के.जी. म्हणायची) आणि पहिलीच्या वर्गाला, पालवणकर दुसरीला, केळकर मास्तर तिसरीला आणि घाटगेमास्तर चौथीला शिकवायचे. पालवणकर मास्तर मारकुटे आणि छडी लागे छमछम पठडीतील मास्तर होते. मळकट धोतर, कोट आणि घामाच्या डागांच्या कडा दाखवणारी टोपी घालत. त्यांच्या घरासमोर बहुधा जांभळीचे झाड असावे कारण ते शाळेत पिशवीभर जांभळे आणायचे आणि मुलाना विकायचे. घाटगे मास्तर छान पांढरी शुभ्र विजार आणि तसाच पांढराशुभ्र झब्बावजा शर्ट घालून यायचे. त्या वयात मला जी काही सौंदर्यदृष्टी होती तिला हे घाटगेमास्तर एकदम रुबाबदार वाटायचे. आवाजही चांगला स्पष्ट असायचा. शाळेतल्या

मुलांकडून नाटके बसवून घ्यायचे. कदमबाई वयस्कर होत्या. त्याना थोडे कमी ऐकू यायचे. मोठा चष्मा होता. चष्म्याच्या काचांतून त्यांचे डोळे आणखीनच मोठे दिसायचे. पण भीती वाटायची नाही त्यांची. मी तसा बऱ्यापैकी हुषार असावा तेव्हा. तर एकदा कदमबाईंच्या बिगरीच्या वर्गात त्यानी कुठला तरी पाढा पाटीवर लिहायला सांगितला होता. तो मी लिहून पाटी त्यांच्या हातात दिली आणि "बाई, मी पाणी पिऊन येऊ?" असे विचारून मागील अंगणात असलेल्या नळाकडे धावलो. पाणी प्यालो आणि खिशात टाचणीने भोक पाडलेला एक रबरी फुगा होता तो नळाला धरून त्यात पाणी भरून घेतले. परत आलो तेव्हा लीलाताई ऊर्फ बेबी चव्हाण नावाची माझ्याच वर्गातली एक मुलगी बाईकडून आपली पाटी तपासून घेत उभी होती. माझी पाटी तपासून बाईनी बहुधा सगळं बरोबर आहे म्हणून बाजूला ठेवली असावी. मी तो पाण्याने भरलेला फुगा त्या मुलीच्या कानाशी धरून दाबला. पाण्याची पिचकारी तिच्या कानात गेली आणि ती किंचाळली. मी हसायला लागलो. एव्हढ्यात "काय करतोयस रे" म्हणत कदम बाईनी माझ्या पाठीत एक जोराचा रपाटा मारला आणि म्हणाल्या, "जा उद्यापासून पहिलीच्या वर्गात बस जा. पळ". गंमत आहे ना? चावटपणाची शिक्षा म्हणून प्रमोशन? पण मिळालं खरं. आणि सहा महिन्यानंतर झालेल्या पहिलीच्या परिक्षेत चक्क पासही झालो. दुसरीला पालवणकर मास्तरांशी गाठ होती. पण वर्षभर निभावून

नेलं आणि केळकर मास्तरांच्या वर्गात आलो. याच केळकर मास्तरांविषयी मला आत्ता लिहायचंय.

केळकर मास्तर तेव्हा बहुधा तिशीच्या वयाचे असावेत. किती शिकलेले होते ते माहीत नाही. पण त्या काळी व्हर्नाक्युलर फायनल म्हणजे आता सातवी, किंवा फार तर मॅट्रिक पास असणे हे क्वालिफिकेशन प्राथमिक शाळेचा शिक्षक व्हायला पुरेसे असायचे. मास्तरांचा पोषाख म्हणजे स्वच्छ धुतलेले, पायघोळ नेसलेले धोतर, पांढरा सदरा, काळा कोट आणि डोक्यावर पांढरी गांधी टोपी. दाढी मिश्या सफाचट केलेल्या असायच्या. त्याना मोडी चांगले लिहिता यायचे. ते सही देखील मोडीतच करायचे. मोडी लिहायला शिकवायचे पण. थोडी फार मोडी लिपीची ओळख मला झाली ती त्यांच्यामुळेच. त्यांच्या बोलण्यात एक खास लकब होती. ते साधा ’काय’ असा उच्चार करायचे नाहीत तर ‘क्काय’ म्हणायचे, ’क्काय रे गणेशा’, ‘क्काय क्काय करशील तेव्हढं थोडंच रे बाबा’ असं. गणित, इतिहास इत्यादी सगळेच विषय त्यावेळी एकाच मास्तराने शिकवायचे असत. केळकर मास्तर हे सगळं शिकवायचे. मध्येच कधीतरी गोष्टी सांगायचे आणि कधीकधी आपली खुर्ची सोडून आम्हा मुलांच्या पाटावर मुलांमधेच बसून पाळी पाळीने गोष्टी सांगायलाही लावायचे. पाट म्हणजे रंधा मारून गुळगुळित केलेली सात आठ फूट लांब आणि दीड दोन फूट रुंदीची, रुंदीइतक्या लांबीचे चार सपोर्ट खाली लावलेली

फळी. मुलांनी आपली दप्तरे आपण बसतो तिथेच फळीखाली सरकावून ठेवायची. चौथीच्या वर्गात मात्र डेस्क्स असायचे. तर केळकर मास्तर मुलांशी जवळीक अशी साधायचे. त्यामुळे आम्हाला त्यांची भीती अशी कधी वाटायची नाही. उलट ते आपल्याजवळ बसलेत याचा खूप आनंद व्हायचा.

आम्ही तेव्हा राजारामपुरीत पाचव्या गल्लीत रहायचो. मास्तरांचे घर तिसऱ्या गल्लीत होते. मी शाळेत जाताना मुद्दाम त्यांच्या घरी जायचो. आणि पुढचा रस्ताभर मग ते आणि मी बरोबर चालायचो. त्यांच्या घरी - घर म्हणजे एक खोली होती - ते स्वत:, त्यांचा एक मोठा भाऊ आणि त्या भावाचा एक माझ्यापेक्षा थोडा लहान असलेला मुलगा असे तिघेजण रहायचे. त्या मुलाची आई वारली होती आणि आमच्या मास्तरांनी लग्न केले नव्हते. म्हणून घरात बाई माणूस कुणी नव्हतेच. मी तिथे पोचायचो तेव्हा दोघे भाऊ चहा पीत असायचे. एखाददिवशी खूप थंडी असेल तर मलाही द्यायचे. गूळ घातलेला बिन दुधाचा चहा असायचा तो. तो आटपला की आम्ही निघायचो. मी थोडा आधी पोचलो असलो तर किंवा मास्तराना आटपायला थोडा वेळ असला तर त्यांच्या घराच्या समोर असलेल्या उंबराच्या झाडाची चांगली पिकलेली उंबरे तोडून घ्यायचो खिशात. मास्तर म्हणायचे "मुकुंदा, उंबराचे दोन तुकडे करून बघून खात जा हं. किडे असले तर टाकून दे. खाऊ नकोस". चालता चालता मास्तर या उंबराच्या फळाबद्दल

सांगायचे. "मुकुंदा, अरे देवाने श्रीमंतांसाठी जशी अंजिरं निर्माण केली ना, तशी गरिबांसाठी ही उंबरं केली बरं का. देव दोघांचीही काळजी घेत असतो हं. या उंबरांसारखंच बघ, श्रीमंतांसाठी द्राक्षं तर गरिबांसाठी करवंद, श्रीमंतांसाठी चिकू तर गरिबांसाठी अळू, श्रीमंतांसाठी साखर तर गरिबांसाठी गूळ हे सगळं त्यानंच केलेलं आहे. तो श्रीमंताना देईल तर गरिबांना पण अगदी तेच नाही तर त्यासारखंच काही तरी दुसरं, त्यांना परवडेल अशी गोष्ट निर्माण करून देईल." दैवाला दूषणे देण्याऐवजी असलेल्या परिस्थितीत समाधान मानण्याचं हे तत्वज्ञान मास्तरांनी किती सोप्या शब्दात मला त्यावेळी सांगितलं होतं! मास्तर कधीकधी मला स्वतः कच्ची उंबरं काढून द्यायचे आणि सांगायचे "ही घरी घेऊन जा आणि आईला दे. अरे यांची भाजी फार छान लागते. नक्की येत असेल तुझ्या आईला". खरंच कच्च्या उंबरांची भाजी फार छान लागते. कदाचित त्या काळात पोल्ट्री व्यवसायाचा आताइतका विस्तार झाला नव्हता त्यामुळे देवानं कच्ची उंबरं अंड्यांऐवजी गरिबांसाठी निर्माण केली असावीत असे म्हणण्याइतकी ती भाजी उकडलेल्या अंड्यांच्या भाजीसारखी लागते. पण केळकर मास्तर ब्राम्हण होते म्हणून ते असं सांगू शकले नसावेत.

मुलांच्या लंगड्या सबबी ओळखून काढण्यात मास्तर अगदी निष्णात होते याचा अनुभव एकदा खुद्द मलाच आला. समोरच्या ब्रँच राजाराम हायस्कूलमधे शिकत असलेल्या छोटू, विना आणि

नाना या माझ्यापेक्षा मोठ्या असलेल्या भावाना 'गुड फ्रायडे' ची सुटी होती. ती आमच्या शाळेला नव्हती. शाळेत आलो होतो खरा पण काही तरी सबब सांगून शाळेला दांडी मारायची होती मला. मी मास्तरांना खोटंच सांगितलं “मास्तर, माझं डोकं फार दुखतंय मी घरी जाऊ का?" मास्तरांनी एकदा माझ्याकडं बघितलं आणि खिशातून तपकिरीची डबी काढली. मला चिमूटभर हुंगायला दिली आणि म्हणाले बघू या बरं तुझं डोकं खरंच दुखतंय का. हा त्यांचा तपासाचा प्रकार मला माहित होता. त्यांचं म्हणणं असायचं की तपकिर हुंगल्यानंतर खरंच डोकं दुखतय का ते शिंक येते की नाही त्यावर दिसून येतं. मी हे पूर्वी एका मुलाच्या बाबतीत पाहिलं होतं पण दुर्दैवानं मला डोकं दुखत असलं तर शिंक यायला पाहिजे की नको तेच नक्की आठवत नव्हतं. मनातल्या मनात झटपट विचार करून शिंक येऊ द्यायची नाही असा रामभरोसे पर्याय मी निवडला आणि  येणारी शिंक महाप्रयासानं दोन तीन मिनिटं दाबून ठेवली. एव्हढ्या वेळानंतर मास्तर काही न बोलता परत त्यांच्या खुर्चीकडं जायला वळले आणि मला मनात वाटले की ”नाही, हे ठीक वाटत नाही. मास्तर जा बोलले नाहीत म्हणजे शिंक न येणं डोकं दुखत नसल्याचं निदर्शक असावं. आपण चुकलो”. मग मी अगदी नाकाच्या टोकापर्यंत आलेली पण दाबून धरलेली शिंक ठ्यां करून जोरात देऊन मोकळा झालो आणि तिथंच घोटाळा झाला.  मास्तर लगेच वळले आणि मला खोटारडा वगैरे न ठरवता म्हणाले, " शाब्बास, आली नं शिंक मुकुंदा? आता

लगेच तुझं डोकं दुखायचं थांबेल बघ." आणि मग मला पूर्ण वेळ शाळेत थांबायला लागलं.

केळकर मास्तर वरून खडबडीत पण आतून रसाळ असलेल्या फणसासारखे होते. आपल्या पुतण्याची काळजी ते त्याच्या वडिलांप्रमाणेच, किंबहुना थोडी जास्तच घ्यायचे. मास्तरांचे बंधु उदबत्त्या करायच्या कारखान्यात नोकरी करत. उदबत्त्याना लागणाऱ्या काड्यांपैकी कदाचित पाहिजेत त्यापेक्षा जास्त पातळ किंवा जास्त जाड असल्यामुळं डिस्कार्ड केल्या गेलेल्या काड्यांचं पोतं त्यांच्या दारात दिसायचं. भावाची प्राप्ती तुटपुंजी असल्यामुळं तिघांच्या उपजीविकेचा भार मास्तरांवरच असावा. कदाचित त्यानी लग्न न करण्यामागचं कारण हेच असावं. पण ते कधीही दुर्मुखलेले, रागावलेले असे दिसले नाहीत. शाळेतल्या मुलांवरही त्यांचं प्रेम असायचं. एकदा मी कांजिण्या (मीझल्स) आल्यामुळं आजारी होतो आणि दोन दिवस शाळेला जाऊ शकलो नव्हतो. तिसऱ्या दिवशी ताप उतरल्यामुळे संध्याकाळी मी आईबरोबर दारात उभा होतो तर गल्लीच्या टोकाकडून केळकर मास्तर येताना दिसले. इकडे कुठे जात असतील असा विचार मनात आला तोच ते आमच्याच घरापाशी येऊन थांबले. बाहेरूनच मला म्हणाले, " बरं वाटतंय का रे मुकुंदा तुला आता? असा बाहेर उभा राहू नकोस बाबा. आत जा." माझी आई उभी होतीच. तिला म्हणाले, "मुकुंदाच्या आई, काळजी घ्या, त्याला वाऱ्यात जाऊ देऊ

नका. आणि कडू लिंबाचा पाला पाण्यात टाकून आंघोळ घाला ताप उतरल्यानंतर. मावळतील कांजिण्या. घाबरू नका." आणि मास्तर निघून गेले. ते घरात आले होते का? की तसेच गेले हे आठवत नाही पण माघारी वळले होते एव्हढे आठवते. म्हणजे ते माझ्या काळजीने मलाच बघायला आले होते हे नक्की. ही आपुलकी आता टीचर्सकडून दाखवली जात नसेलच असे म्हणत नाही पण अभावानेच असेल हे मात्र खरे.

केळकर मास्तर माझ्या मनावर कोरले गेले ते अशा गोष्टींमुळे. मी चौथी पास झालो त्या वर्षी शाळेला पाचवीचा वर्ग काढायची परवानगी मिळाली आणि मी त्याच शाळेत राहिलो. पण त्याच वर्षी केळकर मास्तरांनी सदानंद विद्यालय सोडलं. मला वाटतं मॅनेजमेंटचं, म्हणजे नाना घाटगे मास्तरांचं - तोपर्यंत कदम बाई रिटायर झाल्या होत्या आणि नाना घाटगे मास्तर हेडमास्तर झाले होते - आणि केळकर मास्तरांचं जमलं नसावं. आम्हीही त्याच सुमारास राजारामपुरीतलं घर सोडून ताराबाई पार्कात रहायला गेलो होतो त्यामुळे केळकर मास्तरांच्या घराचा रस्ता चुकला. त्यांची भेट व्हायची नाही. सहावीला मी घराजवळच्याच रावबहादुर विचारे विद्यालयात दाखल झालो. त्यामुळे तर मास्तर मला नंतर कित्येक दिवस दिसलेच नाहीत. आणि एकदा दिसले रस्त्यात तर तोच पेहराव पण खूपच मळलेला अशा अवस्थेत दिसले. मला म्हणाले, "क्काय मुकुंदा, कुठल्या शाळेत जातोस आता? नीट

अभ्यास करत जा हं. खूप मोठा हो." विचारल्यानंतर स्वत:बद्दल एव्हढेच म्हणाले की आता ते शिवाजी उद्यमनगरातल्या एका ऑईल इंजिन कारखान्यात नोकरी करताहेत. असे का झाले, एका चांगल्या शिक्षकाला ते क्षेत्र सोडून पूर्णतया भिन्न क्षेत्रात का जावे लागले याची उत्तरे शोधण्याची तेव्हा ना माझी कुवत होती ना तेव्हढी समज. वाईट फार वाटलं एव्हढं मात्र नक्की. मनात ठरवलं, मी खरंच मोठा झालो तर त्यांच्यासाठी काहीतरी करायचं. पण हे काही घडलं नाही. मास्तर पुन्हा कधीही भेटले नाहीत. त्यांचे बंधु वारले आणि पुतण्या चांगला शिकून कोणा कारखानदाराचा घरजावई झाला असं समजलं. पण मास्तर भेटले नाही ते नाहीतच. आता तर माझ्याच जीवनाची संध्याकाळ झाली आहे तेव्हा ते असण्याची शक्यता कशी वर्तवू? रुखरुख आहे मनाला अजून हे मात्र नक्की.

---

# ५. मी घेतलेली पहिली मुलाखत

जीवन वृत्तांत, परिचय, किंवा मुलाखती हे प्रकार अलिकडे मराठी साहित्यात खूपच वेळा दिसू लागले आहेत. कुठलेही एखादे नियतकालिक उचला आणि उघडा, त्यात एक तरी परिचयात्मक लेख आलेला असलाच पाहिजे. एखाद्या अंकात एखाद्या गृहस्थाची मुलाखत दिसली नाही असे कोणी एखादा स्वत: छातीठोकपणे मला सांगेल तर मी स्वत: त्याची मुलाखत घेऊन ती छापवून आणेन. अमका अमेरिकेहून आला, आली त्याची मुलाखत! तमक्याने 'दंतमंजन' शब्दकोड्यात बक्षिस मिळवले, आले त्याच्या यशस्वी आयुष्याचे रहस्य छापून! तमक्याची शंभरी साजरी झाली, आला जीवनवृत्तांत! या सत्तऱ्या, शंभऱ्यांच्या इतक्या मुलाखती पाहिल्यात की मला आता वाटायला लागलय मी जर बरोब्बर पंचाहत्तराव्या वर्षी मेलो तर नंतर लगेच कोणीतरी माझीही मुलाखत घेऊन छापून आणील. आमच्याच कॉंप्लेक्स मधले मुलाखतमार्तण्ड श्रीयुत आण्णा आदवणकर यांनाच तो मान मिळावा अशी माझी इच्छा इथे मी नोंदवून ठेवतो.

हं, तर काय सांगत होतो? मी पण म्हटले एकदा आपणही मुलाखती घ्याव्यात. इतर काही लिहायची कुवत नाही तर चार ठराविक प्रश्न विचारले आणि उत्तरे लिहून घेतली म्हणजे ‘मुलाखत घेणारा’ म्हणून तरी आपलं नाव छापून येईल ही

अंतरीची इच्छा! पण मुलाखती घ्याव्यात म्हटले तरी कुणाच्या घ्यायच्या? झाडून सगळ्या प्रसिद्ध व्यक्तींच्या मुलाखती आधीच कोणी ना कोणी तरी घेऊन ठेवलेल्या होत्या. किंबहुना त्यातले बरेच लोक आधी मुलाखती छापून आणवूनच प्रसिद्ध झाले होते. तेव्हा विचार केला की आपण आपले जनसामान्यातील व्यक्तींच्याच मुलाखती घ्याव्यात. हो, कारण प्रसिद्ध व्यक्तीची मुलाखत म्हणजे वेळ आधी ठरवून जायला लागते. मग त्या ठरवलेल्या वेळी कोणी मंत्री कामाच्या फायलीत डोके खुपसून बसल्याचे दाखवतो तर कोणी गांधीवादी चरखा पुढ्यात ठेवून मुलाखत्याची वाट पहात असतो. कोणी मराठी नटी भाकरीचे पीठ परातीत घेऊन विस्तव नसलेल्या चुलीवरील तव्यावर भाकरी टाकत बसते आणि मग तिच्या मुलाखतीत छापून येतं “कुमारी जयवंतीबालादेवी यांना स्वत:च्या हातानी स्वयपाक करून कुटुंबियाना आग्रह करून (हरे राम! ) वाढण्याची फार हौस आहे. बाहेरच्या जगात त्या उंची कपडे वापरत असल्या तरी घरात अगदी नऊवारीत ओचे पदर खोचून सर्व घरकाम करण्यात त्याना फार समाधान वाटते." वगैरे वगैरे.

तर असे भोंदूगिरीचे प्रकार टाळायला म्हणून मी साध्यासुध्या माणसांच्या मुलाखती घ्यायचे ठरवले. भोंदुगिरीही नाही आणि ते एक नाविन्य पण होईल असा विचार केला आणि सर्व प्रथम आण्णा आदवणकरांच्याच ओळखीच्या एका गृहस्थांकडे गेलो.

त्यांच्यासंबंधीची किरकोळ प्राथमिक माहिती मी आदवणकरांकडून अगोदरच मिळवून ठेवली होती.

नाव: आबासाहेब ऊर्फ विठ्ठल तुकदेव पालवणकर.
वय: ४८ वर्षे.
शिक्षण: बी. ए. डी. एड.
व्यवसाय: नोकरी – म्युनिसिपालिटीच्या प्राथमिक शाळेचे हेडमास्तर.
सांपत्तिक स्थिती: महिना १०० रुपये कर्जाचा हप्ता जाऊन संसार चालण्याइतकी प्राप्ती.
अपत्ये: ६ मुली अनुक्रमे २२, १९, १७, १५, १३, ११ वर्षे वयाच्या आणि एक मुलगा अडीच वर्षे वयाचा. सगळी अपत्ये अविवाहित.

एवढी माहिती मिळवून एका रविवारी मी त्यांच्या घरी गेलो. आबासाहेब बाहेरच्या खोलीतच निळ्या पट्ट्यापट्ट्यांच्या कापडाची अर्धी चड्डी आणि बनियन परिधान करून दाढीच्या पिकाची खुरपणी करत होते.

मी: नमस्कार
आबासाहेब:कोण पायजे?
मी: आबासाहेब आपणच ना?
आ.: होय होय.काय काम?

मी:	म....मी... मला मुलाखत घ्यायची होती तुमची थोडक्यात. आण्णा आदवण........

आ.:	बरं बरं बरं! तुम्हीच का ते? आण्णा आदवणकर म्हणाला होता खरा परवाच. बरं बसा हं आलोच मी.

मग आबासाहेबांनी दाढी उरकली आणि तसेच, म्हणजे अर्ध्या चड्डीतच येऊन माझ्यासमोर गालावर टॉवेल दाबत खुर्चीवर बसले. सुरुवात कशी करावी याचा विचार करत होतो तोच आबासाहेब बोलले:

आ.:	नाव काय तुमचं?

मी माझं नाव सांगितलं.

आ.:	काय करता?

मी:	क्लार्क आहे चोर अँड टे कंपनीत.

आ.:	अस्सं अस्सं. छान. काय मिळतं? म्हणजे आपलं पगार बिगार?

तसा सांगण्यासारखा नव्हता म्हणून मी माझा पगार उगीचच जरा वाढवून सांगितला, जवळजवळ दीड पटीने.

आ.:	ठीक ठीक. घरात माणसं किती?

मी:	आहेत सात. आता मी ..........

आ.:	सात तोंडं खाणारी. मग कसं काय करता हो? भागतं कसं एवढ्यात? लग्न बिग्न झालंय का?

मी:	मोठ्या भावाला चांगला पगार आहे आणि वडिलांचं पेन्शन येतं. तेवढ्यात भागतं. लग्न झालं नाही अजून. बरं आता मुलाखतीला..........

आबासाहेबांच्या चेहयावर एक विचित्र चमक आली आणि मला अडवून लगेच ते म्हणाले,

आ.:	नाही झालं का? वय काय असेल हो तुमचं? तरी पंचवीस?

मी:	अठ्ठाविसावं चालू आहे. पण आबासाहेब, ...........

आ.:	अठ्ठावीस? मग अजून लग्नाचे का हो राह्यलात? या वयात म्हणजे अ मॅन म्हणजे नीडस अ वाईफ. आं? काय विचार करत आहात काय?

मी:	अजून केला नाही.

आ.:	अहो पण तुमच्या आई वडलांनी नको का करायला विचार? बरं गोत्र काय तुमचं?

मी:	माहित नाही.

आ.:	भले! अहो तुमचं गोत्र तुम्हाला माहित नाही? काय म्हणायचं हे?

मी:	असं पहा आबासाहेब, म्मी तुमची मुलाखत घ्या ...........

आबासाहेब माझ्या बोलण्याकडं दुर्लक्ष करीत म्हणाले,

आ.:	काय हो मंगळ बिंगळ आहे काय तुम्हाला?

मी:	नाही, मला मंगळ नाही आणि बुधही नाही.

आ.:	अहो रागवू नका असे. त्याचं असं आहे, मला आहेत सहा मुली. थोरली आहे २२ वर्षांची.म्हणून विचारलं हो. बघा विचार करत असलात तर. थांबा, बोलवतोच तिला. शकू…, ए शकू….

मी:	माफ करा आबासाहेब पण माझं काम राहूनच…

आबासाहेब उठून आतल्या दाराकडं जात म्हणाले,

आ.:	ऐकलं का हो? शकूबरोबर चहा पाठवून द्या दोन कप बाहेर. (आणि मला उद्देशून..) काय चहा घेता ना?

मी:	नेहमी नाही घेत. कधी कधी.

आ.:	अहो घ्यावा. चहानं काय होतंय? चहा पायजेच दिवसातून चार वेळ तरी! बरं दुसरं काही व्यसन? सुपारी वगैरे?

मी:	नाही.

आ.:	सिगारेट, पान?

मी:	नाही हो अगदी कश्शाचं नाही. पण आता ……….

आ.:	उत्तम! तरुणानी असंच असावं हो. बरं, पण तुम्ही काय मॅट्रिक पास तरी असालच ना?

मी.	मी बी. ए. आहे.

आ.:	हो का, छान! आमची शकू पण होती कॉलेजात, दोन वर्षं, ते प्री डिग्री का काय म्हणतात त्याला. बरं वडील काय करतात आपले?

मी:	पेन्शनर आहेत.

आ.:	अस्सं? कुठल्या डिपार्टमेंटला होते?

मी:	मिलिटरी अकाउंट्स.

आ.:	छान छान! काय पेन्शन काय बसलंय?

मी पेन्शनचा आकडा सांगितला.

आ.:	अरे व्वा! म चांगलं चाललं असलं पायजे तुमचं. बरं बहिणी किती?

मी:	नाहीत. धाकटे दोन भाऊच आहेत. एक दहावीत आणि एक सातवीत.

आ.:	छान छान. बरं तुम्ही कुठले मूळचे? पेण-पनवेलकडचे का?

मी:	नाही. आम्ही महाडचे.

आ.:	हो का? म तुम्हाला महाडचे ते सदोबा भटजी माहित असतीलच?

मी:	नाही हो. मी महाड काळं का गोरं पाह्यलं नाही अजून.

आ.:	असू द्या असू द्या. वडलाना माहित असतील तुमच्या. भेटायला पायजे त्याना एकदा. राहता कुठं हो?

मी आता संपूर्ण शरणागती पत्करली होती. मुकाट्याने पत्ता सांगितला. तो आबासाहेबांनी आपल्या डायरीत फुल्या मारून कॅन्सल केलेल्या अनेक पत्त्यांच्या खाली लिहून ठेवला. आता ही मुलाखत कशी आवरावी याचा मी विचार करत होतो तेव्हढ्यात आबांची थोरली कन्यका शकुंतलाबाला आपल्या विरळ केसांच्या आवळून बांधलेल्या तोकड्या वेण्या उडवत अवतीर्ण झाली.

आबासाहेबांनी तिच्या हातातून चहाचा कप घेतला आणि मला देत म्हणाले, ’ही आमची शकू’.

मी: नमस्कार.

आ.: घ्या, चहा घ्या. बस गं बाळ.

चहा घेतल्यानंतर आबासाहेब म्हणाले,

आ.: ठीक, हे बरं झालं. आता तुम्हाला हिला काही प्रश्न विचारायचे असतील तर विचारा बरं का. अगदी बेलाशक.संकोच करू नका.

झालं! म्हणजे मी आलो होतो आबासाहेबांना प्रश्न विचारायला, तर त्यांनीच मला विचारले आणि आता म्हणतायत त्यांच्या मुलीला प्रश्न विचारा म्हणून! मी घाईघाईने उठलो आणि दाराकडे जात जातच या असाधारण मुलाखतीचं भरतवाक्य म्हणून टाकलं, 'छे हो, आज तुमचीच मुलाखत घ्यायची होती. पुन्हा केव्हा तरी यांची घेऊ. बरंय, चलतो मी आता. नमस्कार.'

संध्याकाळी आदवणकरांना हा सारा रिपोर्ट दिला तेव्हा त्यांनी हसून माझ्या पाठीवर थाप मारली आणि म्हणाले, 'बाबा रे, खरं म्हणशील तर तू मुलाखत फार यशस्वी रीतीने घेतली आहेस. आता असं कर, थोड्या दिवसांकरता हे सारं विसरून जा. मी थोडा बिझी आहे म्हणून. नंतर ही तू घेतलेली मुलाखत वाच पेपरमध्ये.'

आदवणकर फारच बिझी होते वाटतं. दोन एक महिने झाले मुलाखत काही आली नाही. मध्यंतरी एकदा रस्त्यात अचानक आबासाहेब समोर दिसले. यावेळी धोतर, कोट, टोपी आणि हातात काठी असा जामानिमा होता. मला वाटले ते मुलाखतीबद्दल विचारतील म्हणून कसे टाळावे याचा विचार करत होतो पण तेव्हढ्यात त्यानी पकडले आणि म्हणाले, 'काय हो बरे आहात ना? नोकरी बिकरी ठीक चाललेय ना? पगार मिळतो का वेळेवर? छान छान. किती मिळतात आता?'
मुलाखतीचा विषय निघाला नाही म्हणून मी थोडासा सैलावलो आणि मागे काय सांगितलं होतं ते न आठवून खरा आकडा बोलून गेलो. तिथंच घोटाळा झाला आणि आबासाहेबांनी लगेच पकडलं. म्हणाले, 'अरेच्चा, मागच्यावेळी सांगितलात त्यापेक्षा बराच कमी झालेला दिसतोय. काय डिमोशन बिमोशन झालं की काय?'
इतका खजिल झालो म्हणता! काही तरी थातुर मातुर शब्द बोलून सटकलो तिथून. शाळामास्तर, आणि त्यातही हेडमास्तर! त्यांच्या स्मरणशक्तीला कमी कसं लेखलं होतं मी?

असो. असाच एक आठवडा गेला आणि मग आदवणकरानी सांगितल्याप्रमाणे खरेच आबासाहेब पालवणकरांची मुलाखत छापून आणली दैनिकात, माझ्या नावाने, अगदी खुमासदार! ही अशी:

**आबासाहेब ऊर्फ श्री वि. तु. पालवणकर, बी ए, डी एड**

विजेरीच्या खोक्यात जे दोन सेल्स असतात ते नेहमी त्या खोक्यातील अंधारात राहून लोकाना प्रकाश पुरवीत आपले आयुष्य व्यतीत करीत असतात. आबासाहेब ऊर्फ वि. तु पालवणकर सर हे एक असंच व्यक्तिमत्व आहे जे अप्रसिद्धीच्या अंधारात राहून लोकोत्तर कार्य करीत आलं आहे. तसं पाहिलं तर आबासाहेब हे जनसामान्यातीलच एक. पण रावबहादुर टिकारे म्युनिसिपल विद्यालयाच्या मुख्याध्यापकाचे काम करून ते अप्रत्यक्षपणे जनताजनार्दनाची सेवाच करीत आहेत नाही का? आबासाहेबांचे संपूर्ण नाव विठ्ठल तुकदेव पालवणकर असे आहे. जवळजवळ एक दशकापेक्षा जास्त काळ ते या पदावर आहेत. आजकालच्या अस्थिरतेच्या जीवनात एकाच नोकरीला लागल्यापासून चिकटून राहण्याची त्यांची चिकाटी खरोखरच वाखाणण्यासारखी आहे.

मी त्यांची मुलाखत घ्यायला गेलो तेव्हा ते स्वत:चीच दाढी करीत होते. त्यांना सलूनमधे जाऊन नापिताकडून दाढी करून घेणे अजिबात पसंत नाही कारण स्वावलंबन हाच त्यानी जीवनात अंगिकारलेला मंत्र आहे. मी कशासाठी आलो आहे हे सांगताच त्यांनी अतिशय प्रेमाने माझे आदरातिथ्य केले. आबासाहेब फार कनवाळू वृत्तीचे आहेत. दुसऱ्याची ते अगदी आस्थेवाईकपणे

चौकशी करतात. एखाद्याला कमी पगार असेल तर त्याचा चरितार्थ कसा चालत असेल या विचाराने त्याना गहिंवर येतो तसेच एखाद्याला भरपूर उत्पन्न आहे असे समजताच त्यांना आंतरिक समाधान लाभते.

आबासाहेब तसे सडेतोड आहेत आणि ठाम मतांचे आहेत. मुलाची लग्नासाठीची किमान वयोमर्यादा काय असावी या प्रश्नासंदर्भात त्यानी अठ्ठावीसाव्या वर्षी माणसाला पत्नीची फार जरूर असते आणि त्यामुळे किमान २५ ते कमाल २८ वर्षे या वयात मुलाचे लग्न व्हायलाच पाहिजे असे आपले ठाम मत असल्याचे बोलून दाखवले. मुलींच्या बाबतीतही २२ वर्षे ही कमाल मर्यादा हवी असे ते मानतात. तरुण मंडळीनी सर्व धार्मिक बाबींची माहिती करून घ्यावी असा त्यांचा कटाक्ष दिसला. आजच्या तरुणांना आपले गोत्रदेखील सांगता येत नाही हे पाहून त्याना वाईट वाटते. तरूण पिढीने निर्व्यसनी असावे असा त्यांचा आग्रह आहे पण त्याचबरोबर दिवसाकाठी चार पाच कप चहाची ते शिफारस करतात. 'चहा हे पृथ्वीतलावरील अमृत आहे' हा सुविचार त्यांनी त्यांच्या घरातील लाकडी तुळईवर खडूने लिहिला आहे. नुकत्याच जन्मलेल्या मुलालाही बाटलीतून चहा पाजावा, तो मुलाच्या वाढीसाठी अतिशय उपयोगी आहे असे त्यांचे म्हणणे आहे.

शैक्षणिक प्रश्नाचा उहापोह करताना, प्रत्येकाने किमान मॅट्रिकपर्यंतचे तरी शिक्षण घ्यावे असे त्याना फार वाटत असल्याचे त्यांनी सांगितले. त्या दृष्टीने त्यानी आपल्या सर्व अपत्यांना तेवढे शिक्षण द्यायचेच असे ठरवले आहे. त्यांच्या सहा कन्यकांपैकी सर्वात मोठ्या, कुमारी शकुंतलाबाला या उच्चशिक्षणविभूषित आहेत. त्या कॉलेजच्या पहिल्या वर्षात गेल्या दोन वर्षांपासून शिकत आहेत.

अबासाहेबांची स्मरणशक्तीदेखील फार तीव्र आहे. कधीकाळी बऱ्याच वर्षांपूर्वी ते महाडला गेले होते. मी मूळचा महाडचा हे समजताच त्यानी तेथील सदू भटजींची ओळख आणि कुशल विचारले. कित्येक वर्षांपूर्वी पाहिलेल्या एका फाटक्या अंगाच्या आणि उपरण्याच्या भटजीला आज इतक्या वर्षांनंतरदेखील ते विसरलेले नाहीत. ही त्यांच्या स्मरणशक्तीचीच नव्हे तर मनाच्या मोठेपणाचीही साक्ष नव्हे काय?

त्यांच्या स्मरणशक्तीबद्दल आणखी एक उदाहरण सांगायचे झाले तर एखाद्याने त्याला किती पगार मिळतो ते सांगितले असेल तर तो आकडा आबासाहेबांच्या आठवणीत पक्का बसतो आणि कालावधीनंतर जर त्या माणसाची भेट झाली तर ते त्या आकड्याची त्याला बिनचूक आठवण करून देतात. इतकी कमालीची तीव्र स्मरणशक्ती लाभली आहे आबासाहेबांना.

आबासाहेबांच्या मनाचा मोठेपणा आणि औदार्य आणखी एका गोष्टीत दिसून येते. त्यांच्या घरी कोणीही पाहुणा आल्यास ते त्याचा अपमान होऊ नये; तर उलट बहुमान व्हावा म्हणून त्याला आपल्या अत्यंत लाडक्या थोरल्या कन्यकेच्या हातूनच चहा देववितात. पाहुण्याला नोकरांच्या हाती चहा देणे हा त्याचा (पाहुण्याचा) अपमान आहे असे आबासाहेबांचे मत आहे. रीति-रिवाज, शिष्टाचार, कोमलपणा, औदार्य, पाहुणचार याबाबतीत हा सामान्य दिसणारा मनुष्य किती असामान्य आहे हे पहायचे असल्यास एकदा तरी आबासाहेबांच्या घराला भेट द्यावीच अशी समस्त तरुण (आणि अविवाहित) मंडळींना माझी आग्रहाची सूचना आहे.

अशा या प्रेमळ, विद्वान आणि कनवाळू गृहस्थाला, त्याने हाती घेतलेल्या स्वकन्याविवाहकार्यात देव यश देवो असे चिंतून हा परिचयलेख मी आटोपता घेतो.

## ६. म्युनिसिपल कौन्सिलर भगवंतराव जमदाडे

"हं, क्काय संबाजीराव, काय इसेस?" म्युनिसिपल कौन्सिलर भगवंतराव जमदाड्यांचा हा तंबाखूच्या पिंकेत भिजलेला प्रश्न सदोदित खेटर मारल्यागत चेहरा करून असणाऱ्या संभ्या लव्हाराचं रोजच स्वागत करतो.

मराठी दुसरी यत्ता 'फ्येल' असलेले हे भगवंतराव जमदाडे चांगली साठएक एकर जमीन बाळगून आहेत. आणि म्हणूनच ते कदमवाडीच्या वॉर्डातून 'मुन्शीपल कोन्शिलर' झालेले आहेत. काही नाही तरी 'कॅरेम' भरायला हातभार (की बूडभार?) म्हणून ते प्रत्येक सभेला जातात; एरवी त्यांच्या मळ्यातल्या झोपडीत बसून मळ्यावर 'नदर ठिवणे' आणि आल्यागेल्याबरोबर चकाट्या पिटणे हेच त्यांचे काम असते. मळ्यातली झोपडी रोज संध्याकाळी त्यांच्या आणि वाडीतल्या एका संभ्या लोहाराच्या गप्पा कान देऊन ऐकत असते.

आज संभाजीराव विशेष काळजीत दिसला. फासेपारध्यांची पालं माळावर पडली म्हणजे त्यांची दोन पाय दोरीने बांधलेली गाढवं गावभर चरताना दिसतात; दोन पाय बांधल्यानं ती जशी खुरडत चालतात तसा हा दोन पायांचा गडी खुरडत आला. आला तो तसाच भगवंतरावांच्याजवळ तांब्या घेऊन बसल्यागत बसला.

"काय संबाजीराव, काय कारबारनीनं कोरड्यास बिगडीवल व्हतं का काय वो आज?"

खाँक थू करून संभ्या बसल्याबसल्याच तोंड बाजूला करून थुंकला. "च्या बायली कारबारनीचं काय रोजचच हाय वो, पर साली पोरंबी काव आनायल्यात राव. तुमास्नी सांगतो बगा भगवेंतराव; ह्या साल्यास्नी येकयेकास्नी ऐरनीव घालून घनानं ठोकून काडावंसं वाटतंया बगा! "

दोन बोटं ओठांवर उभी धरून त्यांच्या मधल्या फटीतून पिंकेची पिचकारी उडवीत भगवंतरावांनी एकदा संभ्याकडे बघून घेतलं आणि म्हणाले, "आता आनि काय क्येलं बाबा तुज्या परल्यानं?"
"क्काय क्येलं? अवो रांडच्च्यानं मलाच भाजिवलं न्हवं का! आयला आपल्यासारं घन बडवाय लागू ने पोराला, चार बुकं शिकून शानंसुरतं व्हावं तेनं म्हनून साळत घातला त्येला तर भडवा साळाच चुकिवतोया म्हनं. आज मास्तर भ्येटला व्हता त्येचा सक्काळच्याला; तवा म्हन्ला. दोम्पारच्याला आल्ता परल्या भाकर खायाला म्हनून; तवा धरला; चार रट्टं लगावलं आनि इचारलं. तसं साल्यानं भट्टीतला चिमटाच उचिल्ला बगा आनि लावला की वो माज्याच हाताला. बायली आसला बोंबाल्लो म्हन्तासा. त्यवड्यात गडी ठ्यां. मायला राती यीलच कनै घरला. तवा बगतो. तुडिवतोच आज साल्याला."

संभ्यानं मनगटावरचा चट्टा एकवार चोखला आणि त्यावर फुंकर घालत गपशार बसून हायला. भगवंतरावांनी एकदा संभ्याच्या हाताकडं बघितलं आणि म्हणाले, "प्चुक प्चुक, बायली लईच बाजिंदं हाय कि रं तुजं परल्या! पर मर्दानीच्या, तुलाबी आसं हुयालाच पायजेल हुतं बग येकडाव. तुला पयल्यापास्नं सांगीत हुतो पोराला साळंत घालू नगोस म्हनून. पर आईकशिला तर न्हवं?"

"तुमी म्हन्तासा भगवेंतराऽव, पर साळंत ग्येल्याबिगार काई खरं न्हाई बगा. न्हाईतर तिच्याआयला हाईच की आमच्यावानी ठॉक ठॉक करायचं! पर म्हन्लं साळा सिकल, म्याट्रिक न्हई तरी निदान सातवी फायनल झालं तरी कुटंतरी मास्तर म्हनून लागंल का न्हई? मजी घन बडवाय नको का काय नको! आवो हाय काय ह्या ल्हवारकीत?"

यावर भगवंतराव एकदा गडगडून हसले आणि म्हणाले, "संब्या, माजं आईक. पोराला साळंतनं काड. न्हाई न्हवं का जीव लागत त्येचा साळंत? न्हाई तर न्हाई. मायला पोरानी कसं उंडरायचं आस्तया शेरड्यांवानी तर तेनास्नी धरतासा आनि डांबतासा साळंत. तुमी बी श्यानं आनि पोरास्नी श्यानं करनारं त्ये मास्तरबी श्यानं! म्या म्हन्तो, मायला न्हाई प्वार साळा सिकलं तर काय बिगडंल? आ? सांग की. आ?"

"बिग्गडतंय क्काय? श्येवटी हाईच की आपली ल्हवारकी. पन्ज्याआज्ज्यापास्नंची माज्यावरची म्हेर्बानगी."

"हांग आस्सं! ...... तू काय शिकलाईस रं संब्या? बायली, आंगटा तरी उट्वाय लागतोय का रं तुला कवा? कुटं घोडं थटलय रं तुजं? सांज सकाळ भाकरी हान्तुयास, घन बडिवतुयास, पानबिडी करतुयास, सगळं आवरुनशान रातच्याला मुडद्यावानी झोपतुयासबी न्हवं? आ? कुटं आडलं गा?" एवढं बोलल्यावर भगवंतरावाना वाटलं काय आपण प्रश्न टाकला पण! संब्याच्च्या बाच्च्या बालाच काय त्येच्याबी बाच्च्या बाला जवाब देता न्हाई यायचा. त्यांनी आपल्या फर्ड्या बोलण्यावर खूष होऊन इकडंतिकडं बघितलं आणि संभ्याकडं बघत असतानाच त्याना एकदम त्यांच्या 'न्हानपनीची' आठवण झाली. ’हॉक’ करून हसून ते चट्ट्याकडं प्रेमळपणानं बघत बसलेल्या संभ्याला म्हणाले, "संब्या, आरं तु या वाडीत नवीन हैस. मी किती शिक्लुया दक्कल हाय तुला?"

"म्याट्रिक न्हाई तर व्हप्पा तरी झाला असशिलाच न्हव?"

"थुत, आरं मी दोन वर्सं शाळंत ग्येल्तो त्येवडंच. आरं आमचा आबा बी आसाच तुज्यावानी, तिर्पागड्या डोचक्याचा! त्यो सोता काय शिकल्याला न्हवता खरं पर त्येला वाटायचं आपल्या भग्यानं

साळा सिकावी. खरं भग्याचं मन कुटं हुतं साळंत? आयला टगेपना करीत वाडीभर उंडारायचो बग. कुटं मोरबाळ्याच्या मळ्यातनं उसाची कांडकी मोड, कुटं पाटलाच्या चिच्चच्या झाडावरनं चिच्चा पाड, कुटं पंचगंगेत पवायला जा आसं कायबाय करायचो. आदी मुद्दलात साळंत ग्येलोच कवा? धा वर्सांचा हुतो बग मी, तवा आबानं साळंत घातलाता. मास्तर हुता बग तवा येक कुरकळणी म्हनून. त्यो तिच्या बायली लई गरीब हुता. गरीब मंजी तसा खवाट हुताच म्हन. माज्या आबाकडनं कुटं बावचीच्या शेंगा न्हे, वांगी न्हे आसं कायबाय कायबाय फुकट न्ह्याचा रोज. पोरास्नी दनादन दनादन बुकलायचा. पर मला मातुर पठ्ठ्यानं कवासुदिक येक बोट म्हनून लावलं न्हाई हां! तर बग त्या वर्साला मी कटाकटी येक म्हयनाभर साळंत ग्येलो आसंन. तरीबी लेका पास क्येलं भाद्दरानं! मातर दुसऱ्या यत्तेला येक मास्तर नवा आला. लई बेरक्या हुता बग त्यो. आयला पयल्या दिवसाला ग्येलो साळंत त्यो हूं म्हनून चिच्चांची कंगलं घिऊन. म्हन्लं ह्यो मास्तरबी घील आनि गप बसंल. पर कुटलं रं! बेन्यानं दिल्या चिच्चा खिडकीतनं फेकून आनि आशी हानली की नाय माज्या कानसुलात! तवाधरनं बग मी त्या मास्तरड्यावर डूकच धरला. पवायला याचा रं त्यो, तवा म्हन्लं येकडाव बुडवायचाच त्येला. पर मर्दा काय जमलंच न्हाई. त्यो तळ्यापसल्या कदमाचा सर्जा हाय न्हवं?...."

"त्यो दुकानवाला?"

"व्हय त्योच. लेकाचा सदोंदी असायचा मास्तरासंगट. त्यो मर्दा पवनार नंबर येकचा. म्हनताना ग्येलो न्हाई बग त्या वाटंला. मग बग येक डाव काय क्येलं, खाजकुयली असतीया न्हवं? ती आनली आनि मास्तराच्या हातरुनात दिली पसरून."

"हातरुनात? त्ये आनि कुटं घावलं तुमास्नी?"

"व्हय तर काय! साळंतच गडी झोपायचा त्यो. तवा येकडाव क्येला ह्यो गोमकाला. दुसऱ्या दिवशी गडी साळंत आला त्यो निस्ता हिकडं खांजळ, तिकडं खांजळ, टरारा टरारा टरारा निस्ता खांजळंतच! बायली मला हासूबी आवरंना. पोरं इचारायली; का हास्तुयास म्हनून; आनि तितंच समदा बावचा झाला. पोरास्नी सांगताना त्या भडव्या सर्ज्यानं आइकलं रं आनि सरळ मास्तरकडं जाऊन सांगितला. तवा बग त्यो मास्तर आला आनि आयला लातच हानली माज्या कंबरड्यात पाक्कदिशान! आस्सला बोंबाललो बग आनि त्येला म्हनलं, "मास्तर, तुज्या आयला, ये तू आमच्या आळीकडं मं बग दावतो तुला जमदाड्याचा हिसका" आनि जो ठ्यां सुटलो कनै त्यो दगडं गोळा करून घरात बसलो लपून. म्हन्लं मास्तर आता आपल्या मागनं येनार….."

"आनि आबा न्हवते?"

"न्हाई गा, आबा ग्येल्ता मळ्याकडं उसाला पानी पाजवाय. मला काय वाटलं? का त्ये मास्तरडं यील घराकडं आबाला सांगाय म्हनून. पर त्ये ग्येलं सरळ मळ्याकडंच आनि दोम्पारच्याला आबाबरूबरच आलं घरला. आबा आला त्यो चिच्चंचा फोकच घिऊन आला. फुडं मास्तर आनि मागनं आबा. मी काय आबाला बगितला न्हाई रं! मास्तर आला आला म्हनून म्या आपला ह्यो टिप्पिरा दगुड उचलला आनि असा उडीवला म्हन्तोस. पर बायली नेम चुकला आनि त्येला लागलाच न्हई. तंवर आबा आला फुडं आनि त्येनं आन त्या मास्तरानं मिळून मला धरून आस्सला श्येकाटला, आस्सला श्येकाटला म्हन्तोस! आरं आमचा ढवळ्या काय मुतंल असा निस्ता खाळ खाळ खाळ मुतायलो मी मर्दा."

"म्हंजी मास्तरानीच तुमचा काटा काडला म्हना की! "

"तर काय रं! बायली अगदी ढोरावानी ठोकला रं मला दोगानी मिळून. राती हातरुनातबी सारका मुततच होतो बग. सक्काळच्याला आबानं इचारलं, "भडव्या साळंत जानार का न्हाई?" तवा गड्या, निस्ता गड्या, आंगाला आस्सा झेंडू फुटलाता म्हन्तोस! तरीबी आमच्या आईच्या मागं हुबं हाऊन म्हन्लो, "ह्यो मास्तर लाता घाल्तोय पेकाटात. म्या श्याप न्हाई जानार

त्येच्याकडं." तवा मं आबानं मला सदरबाजारच्या साळंत घातलं. तितं बग कटाकटी सा सात म्हैनं काडलं असतील. त्येवड्यात आबा आमचा गचाकला आनि माजी साळा सुटली. आबा गेला म्हनून रड्लो पर साळा सपली म्हनून लई बरं बी वाटलं मर्दानीच्या."

"मं तितनं फुडं साळंला ग्येला न्हाईच म्हना का?"

"छ्या, तितनं फुडं मग मळ्यातच राबलो बग. आस्सा मळा क्येलाय म्हन्तोस! बग, आबाकडं धा येकर मळा होता. मी त्येच्यावर वाडीत आनि कागलला मिळून आनि पन्नासएक येकर जिमीन घेतली."

"हैन तिच्यामारी! मायंदाळच पैका वडलासा की वो."

"तर रं. आता मला सांग, मी काय साळा सिकलो हुतो का? आयला दोन वर्सं साळला गेलो हुतो त्येनं काय ढेकळं येतय आमास्नी लिवाय वाचाय? तरीबी येवडं केलंच का न्हाई? आनि मुन्शीपाल्टीचा कोन्शिलर बी झालो का न्हाई? आनकी काय पायजे? आं?"

"म्हंजी बिनशिकताच येवडा बारदाना वाडिवलासा म्हना की?"

"आता बग की तूच! बरं माजं येक ऱ्हाऊन दे; आबा तरी काय सिकलाता? तरी काई न्हाई तरी धा येकर जिमीन बाळगून हुताच का न्हाई? काय कदी भाकरतुकड्याची वान पडली न्हाई त्येला. आनि माजं तर तू बगतुयासच."

"व्हय व्हय! "

"आरं खरी मजा म्होरंच हाय मर्दा. त्यो मास्तर? येवडा शिकल्याला? काय मिळीवलं त्येनं? काल परवाच आल्ता माज्याकडं. मुन्शिपाल्टीच्या साळंत त्येच्या दोन पोरान्ला त्येवडं लावून घ्या म्हनून सांगत हुता. म्हन्जे हाय का नाय तूच बग! "

"आत्ताएच्च्याआयला! "

संभ्यानं काढलेल्या ह्या उद्गारामुळे भगवंतराव सुखावले. त्यांनी आपला पाचुंदाभर मिश्यांचा झुबका चाचपीत इकडे तिकडे नजर टाकली. वस्तीकडनं त्यांची लक्षुमी चार वर्षांच्या त्यांच्या पोराला पुढं घालून झोपडीकडं येत होती. त्यांनी बसल्या जागेवरनंच हाक दिली, "काय हाय?"

चिंतेने व्यग्र झालेल्या लक्ष्मीनं एक पाकीट त्यांच्या हातात दिलं आणि म्हणाली, "कागुद आलाय बगा पोष्टातनं. तार हाय म्हनं. बगा तरी काय हाय त्ये! "

तार म्हटल्यावर भगवंतराव नाही म्हटलं तरी जरा चरकलेच. मुकाट तोंडानं त्यांनी पाकीट उघडलं आणि आतला कागद पाहू लागले. पण त्यावरल्या इंग्रजी अक्षरांनी ते अधिकच गोंधळून गेले. तिघंही गंभीरपणे त्या कागदाकडं बघत बसले. बाजूनंच गावाच्या दिशेला चाललेल्या मास्तरांनी, "क्काय भगवंता?" असा निर्हेतुक प्रश्न टाकला नसता तर ते आणखी बराच वेळ तसेच बसले असते. मास्तरांचा आवाज ऐकून भगवंतरावांचा चेहरा थोडा उजळला. त्यांनी तो कागद मास्तरांकडे दिला आणि आवाजातली अगतिकता शक्य तेवढी लपवायचा प्रयत्न करत ते म्हणाले,

"गुरुजी, जरा बगा वो काय हाय त्ये. जरा घ्या थोडा तरास आमापायी. आमी तिच्याबायला आडानी ऱ्हायलो, म्हनून तुमास्नी सारकं सारकं तरास देनं पडतया बगा. जरा करा आमावर थोडी म्हेरबानगी."

हे बोलताना त्यानी थोड्या वेळापूर्वीच्या आपल्या निष्ठावान श्रोत्याकडं एक चोरटा केविलवाणा कटाक्ष टाकला. पण

भाजलेल्या चट्ट्यावर फुंकर घालत असलेल्या संभ्याचं त्यांच्याकडं लक्षही नव्हतं.

## ७. दौलू

सेना न्हावी या संतानंतर आमचा दौलू न्हावीच! सेनाच्या काळात दौलू नव्हता म्हणून ..... नाही तर सेनाने तेव्हाच जाहीर करून टाकलं असतं, 'दौलू हाच माझा आध्यात्मिक वारस आहे' म्हणून! माझी खात्री आहे दौलूची संतमहात्म्यांवरची, धर्मावरची प्रवचनं तुम्ही ऐकली असती तर तुम्हालादेखील माझं म्हणणं पटलं असतं.

या दौलूचा जन्म कुठं, कधी आणि कशासाठी झाला हे विचारायला माझ्या तोंडाला 'उघडीक' कधी मिळू शकलीच नाही. वास्तविक मला हे विचारायचं कारणहि नव्हतं ही गोष्ट खरी आहे. तरीहि आता त्याच्यावर चार ओळी लिहायला घेतल्या आहेतच तर म्हणून वाटतं की विचारलं असतं तर बरं झालं असतं; एव्हढंच!

मला लहानपणीच्या ज्या तीन गोष्टी प्रामुख्यानं आठवतात त्या म्हणजे, एक .... वडिलांनी चुलीवरून पेटवून आणायला सांगितलेली आणि पेटवून घेऊन जाता जाता मधल्या खोलीत मी ओढलेली विडी, दुसरी .... एकदा मीच कांगावा करून मोठ्या भावाला खायला लावलेला मार, आणि तिसरी .... दौलू आमच्या घरी येत असे आमचे केस कापायला तेव्हा त्याने मला म्हटलेले वाक्य, “काय ढाण्या वाघागत बसलाईसा राव! काय डोई मारतोय का काय? नाव किस्नाचं हाय, बसा की वाईच किस्नावानी! ”

कृष्ण आपला 'बॉबकट' करून घ्यायला दौलूच्या पुढ्यात कसा बसला असेल हे दृश्य डोळ्यांपुढं आणायचा प्रयत्न करून मी सावरून बसलो तेव्हा "हाम्बघा, आस्सं. बसा जरा नीट ताठ. शाब्बास पठ्ठे! " अशी शाब्बासकी दिली होती मला दौलूनं ती.

असा हा आमचा दौलू. माझ्या लहानपणी तो दर एक महिन्यानंतर आमच्या घरी यायचा. बाहेरच्या खोलीत सतरंजी अंथरून तीवर बसून घरातले सगळे पुरुष मेंबर्स पाळीपाळीनं आपआपलं डोकं दौलूच्या हवाली करायचे आणि दौलू त्यावर सफाईनं (म्हणजे जागोजागी रक्त काढत) हात आणि कात्री चालवायचा. मला तेव्हा त्याचा वस्तरा कानाच्या वरच्या भागावरील कोरीव काम करताना कान कापला जायची इतकी भीती वाटायची की माझी पाळी येताच मी घराबाहेर धूम ठोकायचा. पण 'मुकीनसायबांचा नंबर' अशी दौलूची आरोळी होताच त्याच्या हातातून जीव बचावून सुटलेले आमचे मोठे बंधुराज आनंदाने, आपण एका मोठ्या गनिमाला पकडायला निघालो आहोत अशा आवेशात येऊन, मला धरून नेत आणि दौलूच्या हवाली करत. तिथं बसेपर्यंत माझी सुटकेसाठी धडपड चाले. पण एकदा का दौलूचा दणकट हात मानेवर पडला (सबंध शरीराचे अंदाजे २०० पौंड वजन दौलू बसल्याबसल्या त्यावेळी त्या एका हातात कसे आणत असे हे मला अजूनही न उलगडलेले कोडे आहे) की माझी मान आपण होऊन हलणे शक्य नसे. "हां, गडबडी करू नका साहेब, नायतर एकदम

चम्मन करून टाकीन बगा" हा त्याचा दम मला पार थंड करून टाकत असे. कारण शेजारच्या शिरप्याच्या चम्मन केलेल्या डोक्यावर मी टपल्या मारलेल्या असल्याने तो उट्टं फेडून घेईल ही भीति वाटे. (ओघानच आलं म्हणून लिहितो, तुळतुळीत हजामत केलेल्या डोक्याला मराठीत चमन का म्हणतात? हिंदीतल्या चमनमध्ये झाडंझुडपं असतात तर मराठीतल्या या चमनमधील डोक्यावरील सारी वनश्री पार उडवून टाकलेली असते. त्यामुळे माझ्या अगाध हिंदीत बाते करताना मला बाग या अर्थी चमन हा शब्द वापरायला, मराठीतल्या 'उजडे हुए चमनकी' याद येऊन, कससंच वाटतं तर मराठीत चमन म्हणताना हिंदीतल्या बहरलेल्या बागेची आठवण येऊन हसायला येतं.)

तर असा हा आमच्या लहानपणीचा दौलू. मी आणखी जरा मोठा झालो तोपर्यंत दौलूनं राजारामपुरीतच तिसऱ्या गल्लीत दुकान टाकलं (कोल्हापुरात 'गाळा' घेऊन दुकान 'टाकायचं' असतं, जागा घेऊन तीत दुकान सुरू करायचं नसतं.) आणि फिरती कारागिरी बंद केली. आम्ही सारे मग त्याच्या दुकानात जायला लागलो. 'श्रीराम हेअर कटिंग सलून, प्रोप्रायटर दौलत विठ्ठल टिपुगडे'' अशी निळ्या रंगवलेल्या पाटीवर पिवळ्या अक्षरांत लिहिलेली पाटी, म्हणजे 'नावाचा बोर्ड' त्याच्या दुकानावर होता. दौलूचा फिरता बिझनेस होता तेव्हाचा खाकी अर्धी चड्डी, बिनकॉलरचा झब्बावजा शर्ट आणि झाडून साऱ्या दूधवाल्या

(म्हणजे दुधाचा 'रतीब' घालणाऱ्या) आणि मंडईत भाजी विकणाऱ्या बाया घालतात तसल्या दोन इंच जाडीच्या, नाल ठोकलेल्या वहाणा हा त्याचा पोषाख दुकानातही कायम राहिला. दौलूला मी कोल्हापुरी फेटा, धोतर, कोट अशा पोषाखात पाहण्याचे दिवसही अधूनमधून यायचे. पॅलेस थेटरच्या मागे असलेल्या खासबाग मैदानात (तोपर्यंत त्या दोन्ही 'लँडमार्क्सची' नावे 'केशवराव भोसले नाट्यगृह' आणि 'शाहू स्टेडियम' अशी झाली नव्हती) जेव्हा कुस्त्यांची धमाल असे तेव्हाचा दौलूचा हा पोषाख. कुस्तीच्या दिवसाच्या आधीचे दोन दिवस आणि नंतरचे दोन दिवस दौलूच्या दुकानात कुस्त्यांवर बौद्धिकं होत, दौलूचीच. मी त्याच्या खुर्चीवर असलो तर तो जेव्हा सवयीने कंगवा धरलेला हात माझ्या डोक्यावर तसाच ठेऊन दुसरा कात्री धरलेला हात नाचवत, “सादिक पंजाब्याला गन्पत आंदळकरानं धोबी पछाड लावाय नगो हुती; तेनंच समदा बावचा केला. पट काढून मग घिश्श्यात घेतला असता तर तवाच सादिक चित हुईत हुता राव” अशी बहुमोल माहिती माझ्याकडं बघून पुरवत “क्काऽऽऽय?” असा होकार अपेक्षिणारा प्रश्न टाकत असे तेव्हा त्याच्या कर्तन करायचं सोडून नर्तन करत असलेल्या कात्रीकडं केविलवाणा दृष्टिक्षेप टाकून मी “हं” म्हणत मान हलवायचा प्रयत्न करत असे. कारण त्याच्या त्या कंगवा धरलेल्या हातानं त्यानं माझं डोकं घट्ट दाबून ठेवलेलं असायचं. मधेच दौलूची 'धाकली पोरगी' दुकानाच्या मागच्याच बाजूला असलेल्या घरातून दुधाची चरवी –

म्हणजे मोठा चकचकीत पितळी तांब्या – घेऊन यायची. मग दौलू कात्री बाजूला ठेऊन त्या चरवीतील शेरभर दूध तोंडात वरून ओतत घट घट आवाज करत पिऊन टाकायचा. वरून ओतून पीत असताना त्याच्या गळ्याचे हाड (मणी) वर खाली होताना पहायला तेव्हा फार मजा वाटायची. त्याच्या हातातल्या ताकतीचं रहस्य या 'घट घट दुधातच' असावं. रिकामी केलेली 'श्रीहरी दौलुबा टिपुगडे' असे त्याच्या मुलाचे नाव घातलेली ती चरवी मुलीकडं देत तो “न्हे जा बाळ” म्हणायचा आणि डाव्या हाताच्या पालथ्या मुठीनं मिशांवर उडालेले थेंब पुसून टाकायचा.

कुस्त्यांवरील भाष्य हे प्रसंगोपात् असायचं. तसे दौलूचे मुख्य विषय म्हणजे अध्यात्म, देवधर्म, आणि पुराणे. लहानपणी मी दौलूकडून पांडवप्रताप, हरिविजय ही पुस्तके वाचायला घरी नेली आहेत. श्रीकृष्णपरमात्मा हा दौलूचा प्रेमाचा, मोठा आवडता गडी! "पांडव धर्मानं रहात. क्काऽऽऽय? म्हणूनच श्रीकृष्ण परमात्मा त्यांच्या बाजूला गेला. न्हाईतर कौरवांकडं काय संपत्ती न्हवती काय हो? माप्प पैसा, दासदाशी, शिर्मंती होती. पण भगवान गेले का त्यांच्याकडं? न्हई. का? तर श्रीकृष्णभगवानांनीच एके ठिकाणी लिवलेलं हाय. तुमी वाचलयसा न्हवं का पांडवप्रताप? हाय बगा त्यात. क्काय? की भगवान म्हणतात, 'मला पैसा नको, मला आराम नको. मला पायजे भक्ति. जो कोणी खऱ्या प्रेमानं मला बोलिवतो, धर्मानं वागतो त्येच्याकडंच मी जाणार'.

क्काऽऽय?" ही वाक्यं सांगताना दौलूचा आवेश असा काही असायचा की ऐकणाऱ्याला हे शब्द भगवानानं अर्जुनाला नव्हे तर दौलूलाच विश्वासात घेऊन सांगितले असणार अशी नुसती शंकाच न येता पक्की खात्री पटायची. ताबडतोब दौलू आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ, दुर्योधन व अर्जुन श्रीकृष्णाला 'तू आमच्या बाजूला ये' असे सांगायला कसे गेले होते व कृष्ण तेव्हा कसा झोपलेला होता ते वर्णन करून सांगायचा.

त्याचा पांडवप्रताप हा विषय संपून संत तुकारामाबद्दलची बौध्दिके सुरू होईपर्यंत म्हणजे दोन वर्षातील जवळजवळ चोवीस वेळा तरी तीच गोष्ट आणि भगवंतांचे तेच म्हणणे मी मुकाट्याने ऐकले आहे. दौलू फक्त भगवान काय म्हणतात तेच सांगून गप्प बसायचा नाही. आज तुमच्या देशाची काय अवस्था आहे आणि ती तशी का आहे हेही सांगायचा. “त्यो गांधी, लई लुच्चा म्हतारा हुता. काय तर म्हनं अहिंसा! अरं व्हय! अहिंसा तर अहिंसा. भगवान काय ऊट सूट हानामाऱ्या करीत हुते काय? अवो भगवानांन्लाबी अहिंसा मंजूर हाय. पर ती आसली अहिंसा न्हवं! आरं तुमची अहिंसा भेकड मानसाची अहिंसा हाय! न्याट न्हई तुम्च्यात. म्हनून अहिंसा अहिंसा करतायसा. आरं मनगटात जोर आसंल तेनंच अहिंसा सांगावी. रडतोंड्यानं अहिंसा म्हटली तर तेला भ्याड म्हन्त्यात. तसला हुता त्यो म्हतारा. देशाची एक आख्खी पिढीच्या पिढी पार खलास करून टाकली त्येनं! आरं षंढ बनवलं

त्येनं तुमाआमाला. क्काऽऽय?” हे दौलूचं मत गांधींच्या अहिंसेवरचं!

दौलूनं समग्र तुकाराम अभ्यासला होता. अभ्यासलेल्या प्रत्येक विषयापैकी एक प्रमुख सूत्र धरून तो ते नेहमी सांगत असायचा. पांडवप्रतापाच्या अभ्यासानंतर जसा त्यानं भगवानाच्या धर्मप्रेमाचा ध्यास घेतला होता तसा तुकारामाच्या अभ्यासात त्याने तुकोबाचे सारे अभंग वाचून त्यातून 'भले तरी देऊ कासेची लंगोटी, नाठाळाचे माथा हाणू काठी’ हा अभंग आपल्या संभाषणाचे सूत्र म्हणून पकडला होता. त्यातूनही तो गांधीबाबावर घसरे. “त्यो म्हतारा काय म्हन्तो? म्हनं भले तरी द्या लंगूटी आनि नाठाळ असला तरीबी द्या कंबरेची लंगूटी फेडून, शिवाय काटी द्या त्येच्या हातात आनि म्हना, 'हान बाबा आम्च्या टक्कुऱ्यात’! आयला काय चेष्टा हाय व्हय? आरं आसं म्हन्तासा म्हनून तुमचा देश आज आसा कचऱ्यावानी पडलाय. जीव न्हई त्येच्यात, प्रानच हायला न्हई! क्काऽऽय?”

हे प्रवचन चालू असताना मधेच दौलूला कामाची आठवण होई. मग तो कात्री सफाईनं चालवत बारीक आवाज काढून विचारी, "वरचे केस उडवायचे न्हवे? आं? ऱ्हाऊ द्यात न्हाई तर. उबे ऱ्हातील. पुडल्या म्हैन्याला जरा करू बारीक". मी कधीच त्याला केस कापायसंबंधी काही एक सूचना द्यायचो नाही. जायचो, त्याच्या

खुर्चीवर कोणी माणूस असला तर नंबरासाठी बाकावर बसायचो आणि जुनेपाने रसरंग, मराठा, आलमगीर, सकाळ, लोकसत्ता वगैरेचे अंक चाळायचो. तेही चाळून संपले म्हणजे दौलूच्या टेबलामागच्या भिंतीवर लावलेल्या गोपीवस्त्रहरणच्या फोटोकडं किंवा श्रीरामाच्या, हात, पाय, दंड, कपाळ, छाती – जिथं जिथं म्हणून शक्य असेल तिथं तिथं गंध, अष्टगंध लावलेल्या फोटोकडं पहात दौलूच्या 'क्काऽऽय?' या प्रश्नाला मान डोलवीत बसून रहायचो. नंबर आल्यावर डोके त्याच्या हवाली करून बसायचो. बसताना हळूच पुटपुटायचो, "दौलू जरा लवकर हं, घाई आहे." दौलू "व्हय व्हय" म्हणायचा आणि सुरुवात करायचा – कटिंगला आणि प्रवचनाला!

मध्यंतरी पाच सहा वर्षं आम्ही घर बदलून दुसरीकडे रहायला गेलो होतो तेव्हढा काळ दौलूकडे जाणे जमले नाही पण त्यानंतर योगायोगाने पुन्हा राजारामपुरीत रहायला जाण्याचा योग आला आणि पूर्ववत श्रीराम हेअर कटिंग सलूनमधे जायला लागलो. या काळात दौलूचा तुकाराम अभ्यासून संपला व समग्र विवेकानंदही झाला असावा. त्याच्या दुकानात आता कृष्ण-गोपी, प्रभू रामचंद्र, संत ज्ञानेश्वर, तुकाराम व शिवाजीमहाराज यांच्या जोडीला पाश्चात्य राष्ट्रातली रमणीय वनश्री, रशियन अंतराळवीर युरी गागारिन, सफेद दंतपंक्ती दाखवीत हसणारी एक मोहक नवयौवना आणि स्वामी विवेकानंद यांचे फोटो लागले होते.

दुकानाच्या आतल्या कोपऱ्यात रेडिओ आला होता. मी साधारणपणे सकाळीच केस कापायला जायचो तेव्हा हमखास रेडिओ सीलोन स्टेशन लागलेले असायचे. त्या स्टेशनवर तिन्ही त्रिकाल चालू असलेल्या प्यार, मुहब्बत, इष्क, प्रीती यांच्या अभंगांच्या साथीत दौलूचं विवेकानंदाख्यान चालू व्हायचं. "आख्ख्या दुनियेत विवेकानंदासारखा नंबर एकचा माणूस झाला न्हाई राव! क्काऽऽय? त्याचीबी अहिंसा हुती पर ती बलवान माणसाची अहिंसा हुती. तुमच्याआमच्यासारकी भेकड अहिंसा न्हवती ती! आरं त्याच्या मनगटात जोर हुता म्हणून त्याला अहिंसा म्हनायला शोबलं. क्काऽऽय??" त्याच्या मनगटात जोर होता हे सांगताना दौलूला आपल्या हातातला जोर आजमावायची हुक्की यायची की काय कोणास ठाऊक, तो गिऱ्हाइकाचे डोके जोराने खाली दाबायचा.

विवेकानंदांचा मनोनिग्रह केव्हढा दांडगा हे सांगताना मोठ्या भक्तिभावाने दौलू सांगायचा, "येवढा मोठ्ठा माणूस. खिशात दमडीसुध्दा नसताना गेला राव अमेरिकेला, क्काऽऽय? तितं जवा का तितल्या बायानी बगितला का न्हाई! ह्यॅ:! मोटा राजबिंडा गडी , तेजवान चेहेरा, कपनी घातल्याली, डोईला फेटा, आनि असा रुबाबदार गडी! लोक सारे बगत्यात टाक माक टाक माक करून! आनि ह्ये आपलं बोलत्यात.... आमचा हिंदु धर्मच श्रेष्ठ म्हणून. भाषण संपल्यावऽऽर, क्काऽऽय?...तेनला एका बाईनं

घरला बोलवून न्हेलं. क्काऽऽय? लई शिरमंत बाई हुती, आनि रुपवान तर अशी म्हनतासा! तरणीबांड हुती राव. आनि राव न्हेलं त्येना घरला आनि खायाला प्याला दिलं. पिला न्हाई गडी ह्यो. काय कुटं चार फळं खाल्ली असतील तव्वर ती बाई नुसती ह्येंच्याकडं डोळं भरून बगतच ऱ्हायलेली. तिच्या मनात पाप आलं राव! वासना उबी ऱ्हायली तिच्या मनात. क्काऽऽय? आन तशी ती ह्येनला म्हणली, 'मला तुमच्यावानी येक मुलगा असावा वाटतोय.' क्काऽऽय. म्हंजे तिला काय म्हनायचं हुत? का माज्या पोटात तू तुज्यासारका येक मुलगा दे. विवेकानंदानी येक डाव तिच्याकडं बगितलं आनि तिला म्हणाले, 'आई, मी हाय की तुजा मुलगा. माज्यासारकाच का, मीच तुजा मुलगा समज की.' ग्ग्गार झाली राव ती बाई तवा तितं! क्काऽऽय? आसा मनोनिग्रव पायजे. न्हाई तर तुमी आमी असतो तर? म्हनलो असतो, 'चल, तू माजी बायको, मी तुजा न्हवरा. येक का? धा पोरं देतो तुला! ' खरं का न्हाई? व्हय. पोरं काडायला काय अक्कल लागतिया? आरं म्हन्तानाच तर आपला ह्यो हिंदुस्तान देश लई लोकानी भरलाय. आयला भार झालाय नुस्ता धरतीला. विवेकानंदाचा आदर्श डोळ्याम्होरं ठेवा, चाट दिशार देश म्होरं जाईल राव! क्काऽऽय?"

हिंदु धर्माचा दौलूला फार अभिमान. हिंदु धर्मच मूळ आणि त्यातनंच बाकी सारे धर्म निर्माण झालेत हे त्याचं ठाम मत होतं. तरूण पिढीत जी पाश्चात्य संस्कृतीची आवड आणि तिच्यातल्या

गलिच्छ गोष्टींचीच उचल करण्याची जी प्रवृत्ती असते तिच्याबद्दल दौलूची तीव्र नापसंती होती. वाईट गोष्टींच्या संपर्कात राहिलं तरी त्या गोष्टींचा आपल्यावर प्रभाव पडू देणं योग्य नव्हे, चांगल्या गोष्टींच्या प्रभावासाठी मात्र आपलं मन मोकळं ठेवलं पाहिजे हे मला दौलूनं एकदा उत्तम दृष्टांत देऊन सांगितलं होतं. "वाइटाच्या संगतीत आपण चांगल्या मनानं गेलो तर कायबी परिणाम होणार नाही आपल्यावर. गंगेच्या पाण्यानं भरलेली घागर जर दारूच्या पिंपात बुडवली तर एक थेंबबी दारूचा घागरीत शिरायचा न्हाई. घागर रिकामी असंल तर मात्र ती लगेच दारूनं भरंल. तवा, वाइटांच्या जवळ जाताना आपलं मन पयलं चांगल्या विचारानी भरलेलं असाय पायजे. आनि तेच, जर दारूनं भरलेली घागर गंगेच्या धारंत शिरली तर? गंगेचं पानी तिच्यात जाईल का? नाव नको. क्काऽऽय? म्हंजे सद्गुणांच्या संगतीत जाताना आपलं मन कसं रिकाम्या घागरीवानी असाय पायजे, कोऱ्या पाटीवानी असाय पायजे तरच शेजारपाजारच्या चांगल्या गोष्टी आपल्यात येतील. आमचं मनच वासनांनी लडबडलंया आनि आमी मोट्या साधुसंतांच्या शेवेला लागलो तर आमी सुद्द होऊ म्हन्ता काय? कवा सुदीक न्हाई होनार. क्काऽऽय? तसंच हाय त्ये! "

तर असा आमचा दौलू! दौलूला दोन भाऊ. मोठा भाऊ गावाकडं शेती करायचा. दौलूला शेतीतलं काही कळायचं नाही (त्याचीच भाषा वापरायची तर 'इय्राट काय कळायचं न्हाई') – म्हणजे प्रत्यक्ष

शेती करण्यातलं – कात्री चालवताना उसाच्या साखरेचा उतारा वाढवायला सल्फेट चांगलं का युरिया का 'मिक्चर'? हे मात्र तो व्यवस्थितपणे समजावून द्यायचा. दौलूचा धाकटा भाऊ दौलूकडंच त्याच्या चार पोराबाळांसंगं आणि 'मंडळी'संगं रहायचा. सहज ओघानं आलं म्हणून या भावाच्या ज्ञानाची माहिती सांगतो. भारतावरल्या चिनी स्वारीच्या वेळची गोष्ट. दौलूच्या दुकानातही राजकारण रंगणं स्वाभाविकच होतं. दौलूनं नेहमीप्रमाणं राज्यकर्त्यांवर घसर काढली. "ह्यो चीन ह्यो आसा उरफाट्या चालीचा आणि आमचा श्याना न्हेरू काय म्हणतो तर चीनला युनोत घ्या! कशाला? आ? म्हणजे त्येनं व्हेटू का काय त्ये वापरायचं आनि आपली वाट लावायची. व्हय का न्हाई? क्काऽऽय?" यावर कोणी एका महाभागानं, "आ त्तस्सं न्हवे दौलुबाऽऽ..." म्हणत चीनला युनोत का घ्यायला पाहिजे ते सांगायला सुरवात केली. नेहमी आपल्याला हटकणाऱ्या मोठ्या भावाच्या विरुध्द बाजू घ्यायला मिळते आहे या विचारानं दौलूचा हा धाकटा भाऊ मधे घुसून म्हणाला, "तर काय राव. घ्यायलाच पायजे. आनि न्हाई घ्येतलं तर त्यो चीन काय गप ऱ्हाईल वाटतंय व्हय तुमास्नी? आवो हिकडं कशी फौज पाटवली तशीच तिकडं बी धाडून दील आणि पयले युनोच काबीज करून टाकील. येवढा मोट्टा हिंदुस्तान हाय, त्येच्यावर हाल्ला कराय डरला न्हाई त्यो. मग युनो युनो काय हाय? आपल्या राजारामपुरीयेवडं तरी हाय

का? चवथ्या गल्लीयेवडंबी नसल. दोन दिवसात युनोबी जिंकल आनि डयरेक्ट हिकडं यील. तवा समजंल ह्येनास्नी! हां! "

दौलूनं आम्हाला अगदी लहानपणापासून पाहिलेले आहे. त्यामुळे आम्ही सगळी भावंडे एव्हढे शिकलो सवरलो, बरे वाईट कसेही दिवस निभाऊन नेऊन सुस्थितीत आलो याचं त्याला कौतुक वाटायचं. मधून मधून तो ते बोलूनही दाखवायचा. वेळोवेळीच्या त्याच्या तत्कालीन आराध्यदैवताचा आदर्श डोळ्यापुढं ठेवायचा आम्हाला उपदेशही करायचा आणि मधूनच एकादी खास फेव्हर म्हणून आमच्या आधी नंबर असलेल्या शेंबड्या पोराला, आम्ही न बोलताही, "जरा दम धर बाळ, सायबाना लवकर जायचंय" म्हणून आम्हाला खुर्चीवर बोलवायचा.

माझा मोठा भाऊ 'भाई' तेव्हा नोकरीनिमित्त गोव्यात असायचा. गोवा पोर्तुगीज जोखडाखालून मुक्त झाल्यावर, तिथं वस्तरे आणि धार लावायचे दगड फॉरेनचे आणि स्वस्त किंमतीत मिळतात असे कोणीतरी सांगितल्यावरून, एकदा दौलू गोव्याला गेला. तिथं भाईला त्याच्या ऑफिसात जाऊन भेटला आणि त्याच्या साहेबाला त्यानं भाई 'न्हानपनी' केस कापताना कसा आरडाओरडा करीत असे ते कौतुकाने सांगितलं. भाईनंही त्याचा पाहुणचार व्यवस्थित केला. त्याला गोवा दाखवायची व्यवस्था केली. लोकानी विचारल्यावर हा आमचा 'चाइल्डहूडमधला बार्बर' अशी ओळख

करून दिली. चार दिवस राहून दौलू कोल्हापूरला परतला. परत आल्यानंतर त्याने भाईला पत्र पाठवलं:

'प्रीय भाईराव,

स.ण.वि.वि.,

तुम्ही मला पावलू बार्देसकराच्या दुकानातून तुमच्या नावावर घेऊन दिलेली फॉरेनची रेजर मशीनं आणि धारेचा दगड बेल्जमचा यांची रक्कम रुपये १३५ मी सवडीने जसी होईल तसी पाठवून देत आहे. मुलाना आसीरवाद. तूमचे दादा व बाकी सगळी मंडळी ठीक आहेत. कळावे. जीवाला जपून रहावे. कळावे

आपला दौलत विठ्ठल टिपुगडे'

पाकिटात पत्रासोबत दहा रुपयांची एक नोटही होती, पहिला हप्ता म्हणून.

मी पुढे मध्यपूर्वेला येऊन जवळजवळ स्थाईक झाल्यासारखा रहात असल्याने कितीतरी वर्षे सवडीने रहायला असा कोल्हापूरला जाऊ शकलो नाही. दोनएक वर्षांपूर्वी तसा योग आला तेव्हा आवर्जून दौलूकडेच केस कापून घ्यायचे म्हणून राजारामपुरीत त्याचे दुकान शोधत गेलो. तिसऱ्या गल्लीतून आता 'श्रीराम हेअर कटिंग सलून' चौथ्या गल्लीत 'वरलीकडच्या अंगाला' हाय बगा' असा ठावठिकाणा मिळाल्यावर तिथे गेलो. दुकान मोठे पॉश झालेले दिसले. भिंत भरून असलेल्या अखंड आरश्यासमोर ओळीत मांडलेल्या चार अगदी मॉडर्न खुर्च्या

होत्या, कारागीर पांढरे धोप एप्रन घालून होते. एकाने मला, 'या साहेब' असे बोलावून त्यातल्या एका खुर्चीवर बसवले. इकडे तिकडे पहात मी दौलूला शोधू लागलो. तेव्हढ्यात समोरच्या आरश्यात मला मागच्या भिंतीवरल्या, टवटवीत फुलांचा हार घातलेल्या फोटोतून भगवा फेटा बांधलेला आणि मिश्किल डोळ्यानी हसणारा दौलू दिसला. डोळ्यानीच म्हणाला, "काय मुकिनसाहेब, काय शोधताईसा? कारागीर माजा नातूच हाय. घाबरू नकासा. डोई मारतोय का काय आपली आसं समजून काय बसलाईसा राव? दुबईतनं आलायसा, बसाकी जरा नीट शेखावानी रुबाबात. बसा जरा नीट, हाम्बघा आस्सं! "

**मुकुंद कर्णिक**
**दुबई**



सप्रेम नमस्कार,

मी मुकुंद संतुराम कर्णिक, सध्या वास्तव्य दुबई (संयुक्त अरब अमिराती) मध्ये, पण जन्माने महाराष्ट्रातील कोल्हापूरचा. आम्ही भाऊ बहिणी मिळून अकराजण. माझा क्रमांक दहावा. आमचे वडील कै. संतुराम रामकृष्ण कर्णिक (संराक) हे स्वत: चांगले साहित्यिक होते. इंग्रजी, मराठी, संस्कृत आणि फ्रेंच या भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. ते "संराक" या टोपण नावाने कविता करत असत. आम्हा सर्वच भावंडांना थोडया फार प्रमाणात त्यांच्यातल्या साहित्यिक गुणाचा वारसा मिळाला आहे.

माझ्या स्वत:विषयी आणखी थोडं सांगायचं तर मी स्थापत्यशास्त्रातील पदवीधर आहे. गेली जवळजवळ ३५

वर्षे सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातींमध्ये त्या क्षेत्रात कार्यरत राहूनही मराठी साहित्यावरील प्रेम जपत, जोपासत आलो आहे. विशेष ओढ कविता करण्यामध्ये पण गद्य वाङ्मयामध्येही  रुचि असल्यामुळे कवितांप्रमाणेच कथा लिहिणेदेखील मला भावते. तरुणाईसाठी लिहिलेली 'हाऊ 'ज दॅट ?' ही माझी एक लघु कादंबरी प्रकाशित झालेली आहे. त्याशिवाय 'बनुताई आणि बंटीबाबा' हा दोन गोड लहान मुलांवरील कवितांचा संग्रह, 'तुझ्याचसाठी' हा आणखी एक कवितासंग्रह, 'श्रीमद्भगवद्गीता – सोप्या मराठीत श्लोकबध्द', 'संस्कृत सुभाषिते मराठीत',  'मनाचे श्लोक – एक अभ्यास' ही श्री समर्थ रामदास स्वामींच्या मनाच्या श्लोकांवरील निरुपणे, इंग्रजी साहित्यातील अजरामर कथांची मराठीत रुपांतरे इत्यादी माझे साहित्यदेखील विविध नियतकालिकांतून, आंतर्जालामधील संकेतस्थळांमधून वाचकांपर्यंत पोचलेले आहे.

प्रस्तुतच्या ई-पुस्तकातील कथा तुम्हाला आवडतील अशी आशा करतो आणि माझ्या वि-पत्र पत्त्यावर तुमचे अभिप्राय कळावेत ही कामना देखील बाळगतो.

मुकुंद कर्णिक

वि-पत्र पत्ता : karnik.mukund@gmail.com

स्थानीय पत्ता: पोस्ट बॉक्स २६२४३४, दुबई, यू.ए.ई.

चलभाष: +९७१ ५० ५९७३८१०

# ई साहित्य प्रतिष्ठान

नमस्कार मित्र मैत्रिणींनो.

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. जगातील चाळीस देशांतील सुमारे साडेतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेत . महाराष्ट्राच्या जवळपास प्रत्येक तालुक्यातील खेड्यापाड्यांत ई साहित्य चे वाचक आहेत. याशिवाय सुमारे तीस ते चाळीस लाख वाचक ई साहित्यच्या वेब्साईटला भेट देऊन पुस्तके डाऊन लोड करतात. पण

याने आमचे समाधान नाही. जोवर महाराष्ट्रातील प्रत्येक साक्षर हा वाचक होत नाही तोवर ही चळवळ चालेल. आमचे लक्ष्य सहा कोटींचे आहे. आमच्या पाठीशी माऊलींचा आशिर्वाद आहे. “ ईये मराठीचिये नगरी, ब्रह्मविद्येचा सुकाळू करी” ही त्यांची प्रार्थना आपणा सर्वांकरवी सुफ़ळ संपूर्ण व्हावी.

आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार. सर्वांची साथ असेल तर.

एवढी विनंती मान्य कराच.

ई मेल पत्ते esahity@gmail. com या पत्त्यावर पाठवा बरं!